दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे
*(आष्टी) वर्धा *बुधवार, २९ जुलै २०२६ *वर्ष ४ थे *अंक १९६ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

पत्नीला जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला पाच वर्षांचा सश्रम कारावास

वर्धा : पत्नीला जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला पाच वर्षांच्या सश्रम कारावाससह २५ हजार रुपयांचा आर्थिक दंड ठोठावण्यात आला. हा निकाल हिंगणघाट सत्र न्यायालयाचे न्यायाधीश काळे यांनी दिला. न्यायालयाने आरोपी गजानन मारोती ठाकरे (वय ५०), रा. मोहदा ता. केळापूर जि. यवतमाळ ह.मु. तळेगाव (टा.) यास कलम ३०७ भादंविमध्ये ५ वर्षे सश्रम कारावाससह २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. जखमी नामे चंदा गजानन ठाकरे आणि आरोपी पती मागील अडीच वर्षांपासुन किरायाने राहत होते. ते रोजमजुरीचे काम करत होते. गजानन ठाकरे यास दारुचे व्यसन होते. दारू प्राशन करून आल्यानंतर त्याने पत्नीसोबत वाद घातला आणि खलबत्त्यासारख्या लोखंडी वस्तुने मारुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी तक्रारीवरून अल्लीपूर पोलिस ठाण्यात कलम ३०७ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक नितीन नलवडे यांनी करून कोर्टात दोषारोप पत्र दाखल केले. सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता दीपक वैद्य यांनी कामकाज पाहिले. पैरवी अंमलदार उमा कचाटे यांनी साक्षदारांना न्यायालयात वेळोवेळी हजर करून कामगिरी बजावली. आरोपीस कलम ३०७ भादंविमध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली.

नैना क्षेत्रातील नगर रचना योजनांमधील त्रुटी दूर करून ग्रामस्थांना मालमत्ता पत्रक वाटप करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : नवी मुंबईतील नैना (नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्ल्यूएन्स नोटीफाईड एरिया) क्षेत्रातील गावांच्या नगर रचना योजनांना तातडीने मंजुरी द्यावी. तसेच मंजूर असलेल्या योजनांमधील त्रुटी दूर करून ग्रामस्थांना मालमत्ता कार्डाचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सिडको-नैना अंतर्गत गावांच्या प्रश्नांसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार महेश बालदी, प्रशांत ठाकूर, विक्रांत पाटील यांच्यासह सिडकोचे व्यस्थापकीय संचालक अश्विन मुदगल, सह व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल आदि उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून नैना क्षेत्रातील नगर रचना योजना प्रलंबित आहेत. मंजूर केलेल्या योजनांमध्ये त्रुटी असल्याचे नागरिक व लोकप्रतिनिधींचे म्हणणे आहे. यासंदर्भात प्रत्यक्ष स्थळावर जाऊन सर्वेक्षण करून त्रुटी दूर कराव्यात. तसेच जमीन मोजणीसाठी आता शासनाने खासगी यंत्रणांना मंजुरी दिली आहे. त्यांच्या मार्फत या क्षेत्रातील जमिनींची मोजणी करावी. नैना क्षेत्रातील तसेच विविध महानगर प्राधिकरणाच्या क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा, वाहतूक, पार्किंग, रस्ते, विकास आराखडा आणि पायाभूत सुविधांचा एकत्रित विचार करून नियोजन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही लवकरात लवकर नैना क्षेत्रातील नगर रचना योजनांना मंजुरी देण्याची सूचना केली. आवश्यक असल्यास मनुष्यबळ वाढवावे. गावकऱ्यांना पात्रतेनुसार जमिनीचे वाटप करून पारदर्शकता ठेवावी. तसेच नैना क्षेत्रात भविष्यात मोठ्या प्रमाणावर शहरे आणि प्रकल्प उभे राहणार असतील, तर त्यासाठी पाणीपुरवठ्याचे नियोजन आधीच करणे आवश्यक आहे. कोंढाणे, केटवणे, बाळगंगा आदी जलस्रोतांचा विचार करून दीर्घकालीन पाणीपुरवठा आराखडा तयार करण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

अरुंद, खराब रस्त्यामुळे स्कूल व्हॅन उलटली

रायजादा टाऊन मार्गाच्या दैनावस्थेमुळे नागरिकांत वाढतोय रोष

वर्धा : वर्धा-यवतमाळ बायपासवरून रायजादा टाऊनकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. या अरुंद व खड्डेमय रस्त्यावर मंगळवार २८ रोजी दुपारी स्कूल व्हॅन अनियंत्रित होत उलटली. सुदैवाने त्यावेळी व्हॅनमध्ये एकही विद्यार्थी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वर्धा-यवतमाळ बायपासच्या सर्किस रोडवरून रायजादा टाऊनकडे जाणारा संपर्क मार्ग गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत खराब अवस्थेत आहे. या भागात मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास असून, पावसाळ्यात रस्त्याची स्थिती आणखी बिकट होत असल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. मंगळवारी दुपारी एम. एच. ३२ क्यू. ३६०५ क्रमांकाची स्कूल व्हॅन विद्यार्थ्यांना रायजादा टाऊनमधे सोडल्यानंतर परत येत होती. यावेळी खराब रस्त्यावर समोरून येणाऱ्या दुचाकीला बाजू देण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि व्हॅन उलटली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र व्हॅनचे मोठे नुकसान झाले. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, या रस्त्याच्या बांधकामासाठी गेल्या अनेक महिन्यांपासून पालकमंत्री, ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने देण्यात आली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

रायजादा टाऊनकडे जाणाऱ्या या मार्गाचे तातडीने सिमेंट काँक्रीट किंवा डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या तेरा वाहनचालकांवर कारवाई

नाकाबंदी दरम्यान वाहतूक पोलिसांची कारवाई

वर्धा : दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर तेरा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये चार प्रकरणांत वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने कारवाई करण्यात आली. याशिवाय वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांतर्गत कारवाई करण्यात आली.



जिल्हातील अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात ब्रिथ अ‍ॅनेलाइझरसह जिल्ह्यात २६ जुलै रोजी नाकाबंदी विशेष राबविण्यात आली. त्या अनुषंगाने २६ जुलै रोजी गस्तीदरम्यान सहायक फौजदार अनिल तिवारी, मुकेश राऊत, शब्बीर सैयद, संतोष राठोड, दिलीप कामडी, प्रदीप कोहळे यांनी इतवारा परिसरात वाहन तपासणी केली. त्यावेळी चार चाहन चालक दारूच्या नशेत वाहन चालविताना मिळून आले. वाहतूक नियंत्रण शाखा कार्यालयात त्यांची ब्रिथ अ‍ॅनालाइझर मशीनव्दारे तपासणी करण्यात आली. त्यावेळी त्यांच्यात अल्कोहोल प्रमाण मिळून आल्याने गुन्हा नोंद करण्यात आला.

-- समुद्रपूर पोलिस ठाण्यांतर्गत पाच वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. पुलगाव पोलिस ठाण्यांतर्गत एक आणि हिंगणघाट उपशाखेअंर्गत तीन वाहनचालकांवर कारवाई करण्यातम आली. वाहन चालकाने वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेच्यावतीने करण्यात आले

वीज कोसळून शेतकरी जखमी

समुद्रपूर : तालुक्यात मंगळवारी दुपारच्या सुमारास मेघगर्जनेसह सुरू झालेल्या पावसादरम्यान गिरड परिसरातील आर्वी शिवारात वीज कोसळून गिरड येथील शेतकरी नंदलाल गुंडे (वय ४४) हे जखमी झाले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी समुद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी २८ जुलै रोजी दुपारी सुमारे १ वाजता गिरड परिसरात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. त्यावेळी नंदलाल गुंडे हे आर्वी शिवारातील शेतात काम करीत असताना अचानक वीज कोसळली. या घटनेत ते जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी तातडीने धाव घेत त्यांना गिरड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना समुद्रपूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

स्वच्छ भारत व जलजीवन मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय द्या

थकीत मानधन तात्काळ अदा करा!, आंदोलनाची वेळ येणे शासनासाठी लाजिरवाणे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करावा : खासदार अमर काळे



स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) व जलजीवन मिशनच्या यशस्वी अंमलबजावणीचा कणा ठरलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना महिनोनमहिने मानधनापासून वंचित ठेवणे ही अत्यंत दुर्दैवी व अन्यायकारक बाब असून, शासनाच्या महत्त्वाच्या योजना राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येणे हे कोणत्याही संवेदनशील प्रशासनाला शोभणारे नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन ताबडतोब अदा करून सेवाविषयक सर्व प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अशी ठाम मागणी खासदार अमर काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रात खासदार अमर काळे यांनी नमूद केले आहे की, राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत कंत्राटी कर्मचारी मागील १० ते २२ वर्षांपासून ग्रामीण स्वच्छता, सुरक्षित पिण्याच्या पाण्याबाबत जनजागृती, माहिती व्यवस्थापन, क्षेत्रीय समन्वय, प्रगती अहवाल तयार करणे तसेच विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. त्यांच्या परिश्रमामुळेच स्वच्छ भारत मिशन व जलजीवन मिशनसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांना ग्रामीण भागात यश मिळाले आहे.

असे असतानाही जलजीवन मिशन अंतर्गत डिसेंबर २०२५ पासून, तर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत फेब्रुवारी २०२६ पासून कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत आहे. अनेक वर्षे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रश्नांवरही अद्याप निर्णय झालेला नाही. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची गंभीर समस्या निर्माण झाली असतानाही या कर्मचाऱ्यांनी शासनाच्या कामात कोणताही अडथळा आणला नाही. उलट जबाबदारीची जाणीव ठेवून त्यांनी योजनांची अंमलबजावणी अखंड सुरू ठेवली. मात्र, त्यांच्या संयमाची शासनाने परीक्षा घेऊ नये, असा इशाराही खासदार अमर काळे यांनी दिला आहे.

या प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीने २३ ते ३१ जुलैदरम्यान जिल्हास्तरीय आंदोलन आणि ३ ऑगस्टपासून राज्यव्यापी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. शासनाच्या दुर्लक्षामुळे कर्मचाऱ्यांना रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर ती बाब अत्यंत दुर्दैवी असल्याचेही खासदार अमर काळे यांनी नमूद केले.

हा प्रश्न केवळ थकीत मानधनाचा नाही, तर राज्यातील सुमारे एक हजार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आणि शासनाच्या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय अभियानांच्या भवितव्याचा आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे केवळ आर्थिक बाब म्हणून न पाहता मानवी दृष्टिकोनातून विचार करून तातडीने निर्णय घ्यावा, असे त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे.

संबंधित कर्मचारी संघटनेने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन खासदार अमर काळे यांना दिल्यानंतर त्यांनी संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून थकीत मानधन तातडीने वितरित करणे, सेवाविषयक प्रलंबित प्रश्न निकाली काढणे आणि आंदोलनाची वेळ येणार नाही, यासाठी त्वरित निर्णय घेण्याची मागणी केली आहे. 'शासनाच्या महत्त्वाच्या योजना यशस्वी करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच न्यायासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर ही निश्चितच चिंतेची बाब आहे. सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन हजारो कुटुंबांना दिलासा द्यावा आणि स्वच्छ भारत मिशन व जलजीवन मिशनच्या कामकाजाला खंड पडणार नाही, याची खबरदारी घ्यावी,' असे आवाहनही खासदार अमर काळे यांनी केले आहे.

चिखलात फसलेय शेतकऱ्यांचे पानंद रस्ते ;अपुरी आणि अर्धवट कामे, निकृष्ट दर्जा, कंत्राटदार कोण?





वर्धा : मातोश्री पाणंद रस्ता योजना ही शेतकऱ्यांच्या शेतात जायला योग्य आणि गुणवत्तापूर्ण रस्ता मिळवून देण्यासाठी तयार करण्यात आली. जिल्हा परिषद पंचायत विभाग, मनरेगा, बांधकाम विभाग आणि काही अंशी सार्वजनिक बांधकाम विभाग या यंत्रणाचे या योजनेवर नियंत्रण आहे. पण गेल्या पाच वर्षांपासून राबविल्या जाणाऱ्या योजनेत रस्ते झाले किती ? आणि शेतकरी समाधानी झाला किती असाच प्रश्न उपस्थित होत आहे. वर्धा जिल्ह्यात बोटावर मोजण्या इतक्या रस्त्याची कामे पूर्ण झाल्याचे चित्र असताना एन खरीप हंगामात अर्धवट असलेल्या पाणंद रस्त्याना दोष देत शेतकरी आपली वाट शोधत आहे.

वर्धा जिल्ह्यात सर्वच तालुक्यात शेतकऱ्यांच्या शेतात पोहचणारे पाणंद रस्ते एकतर नाल्याच्या स्वरूपात आहे तर कुठे अरुंद बोळीप्रमाणे आहे. गेल्या अनेक वर्षात या पाणंद रस्त्याच्या समस्यांनी ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद एवढेच नाही तर विधानसभा सदस्य देखील शेतकऱ्यांनी बदलवली असल्याची अनेक उदाहरणे आहे. अलीकडे पाणंद रस्त्यासाठी शासनाचा गाजावाजा झाला. आराखडे तयार झाले, अंदाजपत्रक देखील बनले पण कुशल कंत्राटदार मिळाला नसल्याने 'पेटी कॉन्ट्रॅक्ट' या भाडेतत्वावर कंत्राट मिळविण्याच्या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे पाणंद रस्ते चिखलात फसल्याचे वास्तव चित्र वर्ध्यात आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत मातोश्री समृद्धी पाणंद रस्ते योजना राबविण्यात येते. वर्धा जिल्ह्यात २०२४ - २५ या वर्षात ९१९ पाणंद रस्त्याची कामे मंजूर झाली. त्याला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देखील मिळाली. एकतर २०२५ च्या उन्हाळ्यात अन्यथा २०२६ च्या उन्हाळ्यात ही कामे पूर्णत्वास जाणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही. वर्धा जिल्ह्यात मातोश्रीमधून काम पूर्ण झालेल्या पाणंद रस्त्याची संख्या १७ आहे. तर काम सुरु होऊन राखडलेल्या पाणंद रस्त्याची संख्या २४२ आहे. विशेष म्हणजे हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कार्यान्वित यंत्रणा म्हणून २८२ रस्त्याची कामे आहे तर जिल्ह्यातील इतर तालुक्यातील ग्राम पंचायत अंतर्गत ६३७ कामे आहे. ग्रामीण रस्त्याची कामे असताना २८२ रस्त्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे का वळती करण्यात आली ? हा प्रश्न शेतकरी जिल्हा प्रशासनाला विचारू लागला आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे ३३० रस्त्याच्या देखरेखीची जबाबदारी आहे तर गट विकास अधिकाऱ्यांकडे ४६३ रस्ते प्रशासकीय मान्यता व देखरेख करण्यासाठी नियंत्रक म्हणून जबाबदारी निश्चित केली गेली आहे. गेल्या अडीच वर्षात केवळ १७ रस्ते पूर्ण होऊ शकले ही खरीप हंगामात रस्ते शोधणाऱ्या शेतकऱ्यांच्या नशिबी आलेले दुर्दैव आहे.

रस्त्याची गुणवत्ता किती ?

मनुष्यबळाचा वापर करून या योजनेतून रस्ता निर्मिती करणे अपेक्षित आहे. रोजगार निर्मिती व्हावी असा हेतू असताना प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही. केवळ कागदावर मनुष्यबळ असते. असेच शेतकरी सांगतात. पण जे पाणंद रस्त्यांची कामे सुरु आहे. त्यातील अनेक रस्त्यावर पहिल्याच पावसात चालणे देखील अवघड झाले असल्याचे चित्र आहे. तहसील कार्यालया अंतर्गत तलावातील गाळ काढण्याची प्रक्रिया मे आणि जून महिन्यात करण्यात आली. पाणंद रस्त्याला ही माती आणि मुरूम वापरणे सहज शक्य झाले असते. पण ज्या संस्था आणि संघटनाना पुढे करून हा गाळ काढण्यात आला. तो गाळ चक्क व्यवसाय म्हणून विकण्यासाठी काढण्यात आले असल्याचे चित्र होते. आता रस्त्यांची गुणवत्ता अतिशय वाईट आहे. माती, मुरूम आणि दगड याचा वापर करून रस्ते होणे अपेक्षित आहे. पण कंत्राटदारांचे पेटी कॉन्ट्रॅक्टर बनलेले राजकीय कार्यकर्ते या रस्त्यासाठी रस्त्यालगत असलेली माती जेसीबीने ओढून रस्ता करीत आहे. त्यामुळे रस्त्यांची गुणवत्ता कशी राखली जाणार असा प्रश्न कायम आहे.

एक किलोमीटर रस्त्यासाठी २० लक्ष रुपयाचा निधी तर दीड किमी रस्त्यासाठी ३० लक्ष रुपयाचा निधी आणि दोन किमीसाठी ४० लक्ष रुपयाचा निधी अशी यात तरतूद आहे. वर्धा तालुक्यातील दहेगाव मिस्कीन, बोदड, भानखेडा, गोजी, करंजी काजी, सेलू काटे,कुरझडी या गावालागत पाणंद रस्ते सुरु आहे. आर्वीच्या वर्धामनेरी, हिवरा, वाठोडा, बाजारवाडा, खरांगना, कारंजा तालुक्यातील तरोडा, परसोडी उमरी येथे रस्त्यांची कामे सुरु आहे. सेलू तालुक्यात देखील सहा पाणंद रस्ते काम सुरु आहे. यात गुणवत्ता असावी यासाठी रस्त्याना भेटी देणारे आणि त्यावर नियंत्रण ठेवणारे अभियंते नाहीत अशीच शेतकऱ्यामध्ये आहे. अभियंत्याच्या साईट व्हिजिट झाल्या असत्या तर पाणंद रस्त्यामध्ये गुणवत्ता राखली गेली असती.

जिल्हा परिषद पंचायत विभागाच्या आकडेवारी नुसार

सेलू तालुक्यात दोन वर्षांपासून७२ पाणंद रस्ते मंजूर आहे. देवळी तालुक्यात १४६ पाणंद रस्ते मंजूर आहे. वर्धा तालुक्यात १०६, आर्वी तालुक्यात १६४, आष्टी तालुक्यात १००, कारंजा तालुक्यात ९७, समुद्रपूर तालुक्यात ११४, हिंगणघाट तालुक्यातील १२० पाणंद रस्ते मंजूर आहे. या रस्त्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता देखील मिळाली आहे. पाणंद रस्त्याची टेंडर प्रक्रिया बांधकाम विभागाकडून होत असल्याने त्याचे कंत्राटदार हे नागपूर सारख्या शहरातून नियुक्त होत आहे. हे कंत्राटदार प्रत्यक्ष छोटी कामे करीत नसल्याने पेटी कॉन्ट्रॅक्ट ही सोयीची पद्धत या योजनेचा भाग बनली असल्याचे चित्र आहे.

संपादकीय

आता तरी बेस्टचे अपघात टळतील?



मुंबईकरांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा वाहतूक पर्याय म्हणजे बेस्ट बस सेवा. दररोज लाखो प्रवाशांना सुरक्षितपणे त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचविण्याची जबाबदारी बेस्टवर आहे. मात्र गेल्या काही महिन्यांत बेस्ट्च्या बस अपघातांच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही केवळ प्रशासनासाठीच नव्हे, तर प्रत्येक मुंबईकरासाठी चिंतेची बाब बनली आहे. या अपघातांमुळे अनेकांना जीव गमवावा लागला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. त्यामुळे एकच प्रश्न उपस्थित होत आहे—आता तरी बेस्टचे अपघात टळतील का?

काही वर्षांत बेस्टच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर कंत्राटी बस गाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. आज बेस्च्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० च्या आसपास बस असून कंत्राटी बसची संख्या अडीच हजारच्या आसपास आहे. परिणामी, अपघातांच्या घटनांमध्ये कंत्राटी बसचे प्रमाणही अधिक दिसून येते. याचा अर्थ असा नाही की कंत्राटी चालक निष्काळजी असतात; परंतु वाढती बससंख्या, अनुभवी चालकांचा तुटवडा आणि कामाचा ताण या सर्वांचा परिणाम सुरक्षिततेवर होत असल्याचे चित्र दिसते.

कंत्राटदार चालकांना नियुक्तीपूर्वी प्रशिक्षण दिले जाते. वाहन हाताळणी, वाहतूक नियम, प्रवासी सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थिती याविषयी त्यांना मार्गदर्शन केले जाते. तरीही प्रत्यक्ष रस्त्यावरची परिस्थिती प्रशिक्षणापेक्षा अधिक आव्हानात्मक असते. मुंबईतील अरुंद रस्ते, वाढती वाहतूक, सतत बदलणारी सिग्नल व्यवस्था, पावसाळ्यातील खराब रस्ते आणि प्रवाशांचा ताण या सर्वांचा सामना करण्यासाठी केवळ प्राथमिक प्रशिक्षण पुरेसे ठरत नाही. सातत्याने पुनर्प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित मार्गदर्शन तितकेच आवश्यक आहे. आज बाजारात प्रशिक्षित बसचालक मिळणे ही मोठी समस्या बनली आहे. जड वाहन चालविण्यासाठी आवश्यक परवाना, अनुभव आणि शिस्त असलेले चालक कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे अनेक कंत्राटदारांना चालकांची भरती करताना अडचणी येतात. चालकांची कमतरता भरून काढण्यासाठी काही वेळा तुलनेने कमी अनुभव असलेल्या चालकांची नियुक्ती करावी लागते. अशा परिस्थितीत अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे, बेस्टचे कायमस्वरूपी चालक अनुभवी आणि कुशल मानले जातात. मात्र त्यांचे वेतन, सेवा अटी आणि इतर खर्च कंत्राटी चालकांच्या तुलनेत अधिक असल्याने कंत्राटदारांसाठी त्यांची नियुक्ती आर्थिकदृष्ट्या अवघड ठरते. परिणामी, अनुभवी चालकांची कमतरता अधिक जाणवू लागते. हा प्रश्न केवळ कंत्राटदारांचा नसून संपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोरील गंभीर आव्हान आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत घडलेल्या काही अपघातांच्या प्राथमिक माहितीनुसार अनेक घटनांमध्ये बसमध्ये मोठा तांत्रिक बिघाड आढळून आलेला नाही. काही प्रकरणांमध्ये मानवी चुका, चुकीचा अंदाज, वेगावरील नियंत्रणाचा अभाव किंवा रस्त्यावरील परिस्थितीचे योग्य मूल्यमापन न होणे ही कारणे पुढे आली. याचा अर्थ चालकांचे सातत्यपूर्ण कौशल्यवर्धन आणि मानसिक तयारी यावर अधिक भर देण्याची गरज आहे. आजच्या आधुनिक इलेक्ट्रिक आणि स्वयंचलित प्रणाली असलेल्या बस पारंपरिक डिझेल बसपेक्षा तांत्रिकदृष्ट्या अधिक प्रगत आहेत. अशा वाहनांमधील ब्रेकिंग प्रणाली, ऊर्जा प्रणाली, इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा आणि सुरक्षा वैशिष्ट्यांची माहिती चालकांना सखोलपणे असणे आवश्यक आहे. वाहन चालविण्याचे कौशल्य जितके महत्त्वाचे आहे, तितकीच वाहनाच्या तांत्रिक प्रणालींची समजही महत्त्वाची ठरते.

प्रत्येक चालकासाठी नियमित पुनर्प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. आपत्कालीन ड्रायव्हिंग सिम्युलेटरचा वापर, आपत्कालीन परिस्थितीतील सराव, मानसोपचार तज्ज्ञांकडून तणाव व्यवस्थापनाचे प्रशिक्षण, थकवा ओळखण्याचे मार्गदर्शन आणि सुरक्षित वाहनचालनावरील कार्यशाळा यामुळे चालकांची कार्यक्षमता वाढू शकते. त्याचबरोबर अनुभवी चालकांकडून नव्या चालकांना मार्गदर्शन करण्याची प्रभावी व्यवस्था उभारणेही आवश्यक आहे. याशिवाय चालकांच्या कामाच्या वेळेवरही लक्ष देणे गरजेचे आहे. सलग दीर्घकाळ वाहन चालविल्यास थकवा वाढतो आणि निर्णयक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे पुरेशी विश्रांती, नियोजित ब्रेक्स, आरोग्य तपासणी आणि मानसिक स्वास्थ्य याकडेही तितकेच गांभीर्याने पाहिले पाहिजे. सुरक्षित प्रवासाची सुरुवात सुरक्षित आणि सक्षम चालकापासूनच होते.

कंत्राटदार, बेस्ट प्रशासन आणि राज्य शासन यांनी संयुक्तपणे चालक प्रशिक्षणासाठी आधुनिक प्रशिक्षण केंद्रे उभारण्याची आवश्यकता आहे. नवीन चालक तयार करणे, विद्यमान चालकांचे कौशल्य वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाची संस्कृती विकसित करणे ही काळाची गरज आहे. अपघातानंतर चौकशी करण्यापेक्षा अपघात होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय अधिक प्रभावी ठरतील. तंत्रज्ञानाचाही अधिक वापर करणे आवश्यक आहे. बसमध्ये चालक सहाय्यक प्रणाली, वेग नियंत्रण यंत्रणा, थकवा ओळखणारी साधने, डॅशकॅम, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सुरक्षा प्रणाली आणि नियमित तांत्रिक तपासणी यामुळे अपघातांचे प्रमाण कमी करण्यात मदत होऊ शकते. मात्र कोणतेही तंत्रज्ञान सक्षम आणि प्रशिक्षित चालकाची जागा घेऊ शकत नाही.

बेस्टची बस ही केवळ एक वाहनसेवा नसून मुंबईची जीवनवाहिनी आहे. त्यामुळे प्रत्येक अपघात हा केवळ आकडा नसून एका कुटुंबाच्या आयुष्याशी जोडलेला असतो. सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड परवडणारी नाही. चालकांची कमतरता भरून काढणे, दर्जेदार प्रशिक्षण देणे, तांत्रिक ज्ञान वाढविणे आणि सुरक्षित वाहनचालनाला सर्वोच्च प्राधान्य देणे या उपाययोजना तातडीने राबविल्या गेल्या तर भविष्यातील अनेक अपघात टाळता येऊ शकतात. मुंबईकरांना वेगवान नव्हे, तर सुरक्षित प्रवास हवा आहे. आणि त्यासाठी सक्षम चालक, आधुनिक प्रशिक्षण आणि जबाबदार व्यवस्थापन यांच्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. बेस्टला नेमके हेच करायचे आहे.

गुरुपौर्णिमा: गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः?

आषाढी पौर्णिमा- गुरुपौर्णिमा विशेष..



गुरूदर्शन व गुरूपूजा करण्याच्या हेतूने आषाढ महिन्यातील पौर्णिमेच्या तिथीला गुरुपौर्णिमा आणि व्यास पौर्णिमा म्हटले जाते. वेद व्यास यांना प्रथम गुरुचा दर्जा देण्यात आलेला आहे, कारण त्यांनी संपूर्ण मानव जातीला चार वेदांचे ज्ञान दिले आहे. गुरु म्हणजे अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जाणारी वंदनीय व्यक्ती होय. सदर माहितीपूर्ण व ज्ञानवर्धक लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी ईशभक्तांच्या चरणी समर्पित करताहेत... संपादक.

गुरूपौर्णिमा हा भारतातील एक महत्त्वाचा सण आहे. भारतीय संस्कृतीत गुरूला देवापेक्षाही श्रेष्ठ मानले जाते. कारण सद्गुरू हेच परमात्म्याचे सगुण साकार रुप असते. म्हणूनच गुरुपौर्णिमेला गुरुपूजन केले जाते. भारतात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि श्रद्धापूर्वक साजरी केली जाते. गुरूपुजेला सर्वच धर्मात अनन्यसाधारण महत्त्व सांगितले आहे. बौद्ध धम्मात तर हजारो वर्षांपासून गुरूपुजेला विशेष स्थान दिलेले आढळून येते. गुरूचा अर्थच अगदी मस्तकात लख्ख प्रकाश पाडणारा प्रतित होतो. गु म्हणजे काळोख तर रू म्हणजे प्रकाशपुंज होय. सद्गुरु लाभला तर ईश्वरप्राती झाली आणि गुरुला पुजता परमेश्वर प्रसन्न झालाच म्हणून समजा. तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतोच-

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः?'

हिंदू धर्मात तसे तर सगळ्या पौर्णिमा त्याच्या त्याच्या खास महत्वांनी परिचीत आहेत. या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान केले जाते आणि होम, जप, तप, दान, धर्म यांसाठी खास तिथी मानली जाते. गुरुमंत्र प्राप्त करण्यासाठी देखील हा दिवस फार महत्त्वाचा ठरतो. या दिवशी आपण ज्यांना आपला गुरु मानतो त्यांचा आदर करावा आणि त्यांना नमस्कार करावा. कारण त्यांनी दिलेल्या ज्ञानातून आपल्या जिवनातला अंधकार नष्ट झालेला असतो आणि गुरुद्वारे भगवंताची प्राप्ती होते. गुर्रुनी दिलेल्या ज्ञानाच्या भंडारातूनच आपण जिवनातील प्रत्येक मार्गावर यशस्वीपणे वाटचाल करतो. प्राचीन काळापासून ते आतापर्यंत गुरु-शिष्यांची ही परंपरा सुरू आहे. या दिवशी फक्त गुरुंनाच नव्हे तर घरातील प्रत्येक ज्येष्ठ सदस्य, आईबडील आणि आपल्या जीवनात कठीण काळात साथ देणाऱ्या प्रत्येकाला गुरुचा दर्जा देत त्यांचे आभार मानावे, त्यांना नतमस्तक व्हावे. सन्मार्ग आणि परमार्थ प्राप्तीचा गुरोपदेश करताना तथागत गौतम बुद्ध किसीलसुत्तात म्हणतात, की गुरुभेटीचा क्षण जाणा व संधी न गमावता आदरपूर्वक गुरूमुखातून येणारे धार्मिक कथन ऐका. निगर्वीपणे विनम्र होऊन योग्य वेळी गुरूपाशी जावे. सदर्थ, धर्म, संयम व ब्रह्मचर्य यांचे स्मरण ठेवून ती आचरावीत- सुत्त निपातः ३२४ व २२६-

'वृद्धापचायी अनुसुय्यको सिया। कालञ्ञ उस्स गरुनं दस्सनाय॥ धम्मिकधं एजयितं खणञ्ञू। सुणेय्य सक्कच्च सुभासितानि॥

कालेन गच्छे गरुनं सकासं। थंभं निरंकत्वा निवातवुत्ति॥ अध्य धमं संयम ब्रह्मचरयिया। अनुस्सरे चेव समाचरे चा॥'

ज्या गुरूद्वारे ईश्वरप्राप्ती होते, त्यास सद्गुरू असे म्हणतात. तो संपूर्ण मानवांच्या व जगताच्या कल्याणासाठी अर्थात केवळ परोपकार करण्यासाठी अवतरित होत असतो. त्याने दिलेले ब्रह्मज्ञान हे दिव्यज्ञान असते. शिष्य जसा त्याचा वापर करेल तसा त्याचा परिणाम त्याच्या जीवनात दिसून येईल. तप्त लोहाच्या गोळ्याप्रमाणे ते असते. त्यापासून सुईसारख्या हत्यार घडविल्यास ते जोडण्याच्या कामी पडते. तर सुरी घडविल्यास ती तोडते. सद्गुरूला मात्र मनाशी मने व माणसाशी माणसे जोडणारा शिष्य अपेक्षित असते. तेव्हाच ब्रह्मज्ञान सत्काराणी लागले, असे म्हणता येते, अन्यथा नाही. तप्त लोहगोळ्यावर काहीच प्रक्रिया केली नाही तर तो थंड होऊन निरुपयोगी ठरतो. अगदी तसेच या ब्रह्मज्ञानाचे सुद्धा आहे. म्हणून त्याचा उपयोग जनकल्याण साधन्याच्या कामी केला पाहिजे. स्वार्थापेक्षा परमार्थ अधिक पटीने साधला पाहिजे. शिष्याने आपल्या दैनंदिन जीवनात चुकल्या-माखल्याची क्षमायाचना या गुरूपूजेच्या पावन समयी केली पाहिजे. कारण जगद्गुरू संत तुकाराम महाराज सांगतात-

'सद्गुरूवांचोनि सापडेना सोय! धरावे ते पाय आधी आधी!!'

ब्रह्मज्ञान मिळाल्यावरच खऱ्या भक्तीला सुरवात होत असते, अन्यथा पालथ्या घड्यावरचे पाणी ठरते. आपल्या भक्तीला नटवण्या-थटवण्याचे काम आपले सत्कर्म करीत असतात. तर आपल्या भक्तीला बदनाम व वाया दवडण्याचे काम आपले दुष्कर्म करतात. म्हणून दुष्कर्माचा अव्हेर केला पाहिजे. समोरचे मनोहारी दृश्य बघण्यासाठी लोक गर्दी करतात. अशावेळी आई बाळाला कडेवर घेते असते. तर बडील मुलाला खांद्यावर घेत असतात. याबाबत त्यांना प्रश्न केले, की असे का? तर ते कृपाळू मायबाप मोठ्या महत्वाकांक्षेने सांगत असतात, की आपण जे पाहू शकलो नाही, ते आपल्या लाडक्या मुलांनी पाहावे. आहे की नाही हे नवल? किती हे औदार्य, किती ही दया! मायबापांची जशी अपेक्षा व महत्वाकांक्षा तशीच सद्गुरूची पण असते. मायबापांनी कच्चा-खांद्यावर घेतलेल्या मुलांनी मात्र अपेक्षेप्रमाणे जे डोळ्यांत साठवायचे आहे, नेमके तेच दृश्य साठवले पाहिजे. तरच ते कष्ट सार्थकी ठरले म्हणावे. जर मुलांनी लोकांचे काळे-गोरेपणा, साधे-शकपक पोषाख, काळे-पांढरे केस आदी गोष्टींच न्याहाळत राहिले. तर मात्र मायबापांचे परिश्रम, इच्छा व महत्वाकांक्षा पार धुळीस मिसळून गेले की हो! यशस्वी जीवनात अशा मौलिक संधी आणि उपलब्धता या केवळ गुरूद्वारे मिळालेल्या ज्ञानामुळे शक्य झाले. ही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गुरूला नमन करण्याचा, गुरू पूजन करण्याचा हा गुरुपौर्णिमा सण आहे. मायबाप, पालक, मार्गदर्शक हे सगळेच गुरुस्थानी मानावे. ज्याला गुरू नाही, असा मनुष्य जगात शोधूनही सापडणार नाही. गुरू सहजच कितीतरी मिळतात, मात्र सद्गुरू सदसद्विवेक बुद्धी जागृत होऊन मिळवावा लागतो. संतशिरोमणी समजावतात- सम्पूर्ण अवतारबाणी: पद क्र. १४१- ओवी ९ व १० वी-

'रीझ जाय यदि सद्गुरू अपना रीझ गया समझो भगवान!

कहे 'अवतार' गुरु कृपा से कण मिट्टी का गगन समान।'

खरे गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द शिरसावंद्य मानून त्यावर चालणे म्हणजे खरे गुरुपूजन! खरे तर गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, गुरूगीतेत म्हटलेच आहे-

'ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा?'

!! गुरुपौर्णिमा निमित्ताने सर्व बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा जी !!

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे (से. नि. प्राध. शिक्षक)
आध्यात्मिक विचारांचे प्रकटकार..
रामनगर- गडचिरोली.
मधुभाष- ९६९९८३६७१७.

गुरु स्मरण..

अंधकार भोवताली करावे गुरुचे स्मरण
अंतरात असे ज्योत कधीन हो विस्मरण

मार्गजरी विस्कटला जावे सद्गुरू शरण
उद्दीष्ट सुस्पष्ट दिसे कर्तव्या येते स्फुरण

गुरू वाक्य कामधेनू सदाचारी हवे धोरण
सद्विचारी भवितव्या बांधा शिक्षण तोरण

साध्य नसे गुरूवीण फुकेमुके शहाणपण
गुरू श्रेष्ठत्व उलुंगत्व गळू पडता अहम्पण

गुरुमार्गे चालत जावे तो गुरूपौर्णिमा सण
गुरू सम आणा गुण फिटे स्वल्पतरी ऋण

जया गुरू असे थोरू सार्थकी होते जीवन
मागे उरावे किर्तीरूपे सु सह्य सुखद मरण

गुरुशिष्य अद्भुतवीण शिष्यपोरका गुरुवीण
नामोल्लेख न कुठेही असूद्या किती प्रवीण

व्यास गुरूंच्या रुपांत उध्दरले रे कण कण
उपकार मानते विश्व युगे न् युगे क्षणो क्षण

- हेमंत मुसरीफ पुणे
७३०३०६९९६

गुरू चरित्र ..

गुरू चरित्र कामधेनू श्रध्दे पारायण करू
बावन्न रांजणे अमृत जीव आपले उध्दरू

अंत:वाह्य सुचिर्भूत गणेशा शारदा स्मरु
दीपधूप लावा पूजा नमू माय बाप गुरू

एकस्थानी सुस्थीरू आवाहन दत्ता करु
भौक्तीक सुखे सारी रे गुरु कृपेने विसरु

प्रमादा क्षमा मागूनि पारायण सुखे स्मरु
वैखरी मन ना स्थीर चुकले तुझे वासरु

उपवास जमेल तसे पारायण होता सुरु
ब्रह्मचर्य नियम पाळू शक्य तेवढे आचरू

रोज किती अध्याय ठरले नियम ते धरू
शब्द भले अडखळे चुका करता सुधरु

नामस्मरण मंद स्वरु मनी ध्यावे दत्त गुरु
अध्याय होता संपन्न नैवेद्याआरती संस्करु

अन्नदान महत् पुण्य सकलाची तृष्णा हरु
पुनर्गमनाया प्रार्थना घडवे कर्म जगद्गुरु

- हेमंत मुसरीफ पुणे
७३०३०६९९६

वहनसुलभ स्वरूपाच्या प्रयोगशाळा!;इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी स्थापना विशेष



संस्थेची सर्वसाधारण व्यवस्था पाहण्याकरिता एक सर्वसाधारण मंडळ आहे. या मंडळात सर्व सभासद राष्ट्रांचे प्रतिनिधी असतात. या मंडळाची बैठक साधारणतः वर्षातून एकदाच भरते परंतु विशेष काम असल्यास आणखी केव्हाही भरविता येते. वार्षिक सभेमध्ये पुढील वर्षाचा कार्यक्रम, खर्चाचे अंदाजपत्रक व सभासदांसंबंधीचे धोरण ठरविले जाते. संयुक्त राष्ट्राकडे पाठवावयाचा वार्षिक अहवाल संयुक्त राष्ट्रे व इतर संस्थांबरोबर केलेल्या करारांसंबंधी विचारविनिमय करून त्यांना मान्यता देण्यात येते. हे मंडळ आपल्यातूनच एक नियंत्रक मंडळ निवडते. हे नियंत्रक मंडळ एका संचालकाची निवड करते. या निवडीला सर्वसाधारण मंडळाची मान्यता असावी लागते. संचालकाची नेमणूक चार वर्षांकरिता असते. हा संचालक संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करतो व त्यांच्या सर्वकामावरील लक्षठेवतो. ही सार्वजनिक आरोग्यव इतर सर्व अभिनाशक उद्योगांच्या उत्कर्षाकरिता अणुऊर्जेसंबंधी संशोधन करून अणुऊर्जेचा वापर करण्यास उत्तेजन देणारी व सर्व प्रकारची मदत करणारी आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था दि. २९ जुलै १९५७ रोजी व्हिएन्ना येथे सुरू झाली. भारत आणि जगातील बहुतेक सर्व राष्ट्रे या संस्थेचे सभासद आहेत. या संस्थेला संयुक्त राष्ट्रांची मान्यता मिळालेली आहे.

या संस्थेतर्फे सीबर्सडार्फ व व्हिएन्ना येथे दोन मोठ्या प्रयोगशाळा चालविण्यात येतात. याशिवाय दोन वहनसुलभ स्वरूपाच्या प्रयोगशाळा असून त्या बाहेरगावच्या कामासाठी वापरता येतात. मुख्य प्रयोगशाळेमध्ये भौतिकी, रसायनशास्त्र, कृषिविज्ञान, वैद्यक, पाणीपुरवठा, समस्थानिक- अणुक्रमांक तोचपण अणुभार भिन्न असलेला त्या मूलद्रव्याचा प्रकार, संरक्षक योजना अशा मुख्य शाखा आहेत. या प्रयोगशाळेत सर्व सभासद राष्ट्रांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे. येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्याही देण्यात येतात. अरब राष्ट्रांकरिता कैरो येथे एक स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र चालविण्यात येते व ट्रिएस्ट येथे जागतिक स्वरूपाचे एक खास केंद्र असून तेथे सैद्धांतिक भौतिकीचा विशेष अभ्यास करण्याची सोय केलेली आहे. मोनॅको येथील फ्रेंच सरकारच्या मदतीने चालणाऱ्या सागरी संस्थेमध्ये या संस्थेच्या वतीने सागरी जीवशास्त्रासंबंधी संशोधन करण्यासाठी एक नवीन प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. व्हिएन्ना येथील प्रयोगशाळेत नवीन अणुकेंद्रीय विक्रियकांचे- अणुभट्ट्यांचे अभिकल्प- आराखडे करण्यात येतात. सभासद राष्ट्रांत उभारावयाच्या अणुकेंद्रीय विक्रियकांच्या प्रकल्पांचे पूर्वपरीक्षण करण्यात येते व ते प्रकल्प समाधानकारक वाटले, तर त्यांना लागणारे साहित्य पुरविण्यात येते. संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने संरक्षक साहित्य आणि कार्यपद्धती यांचे मानकीकरण- मार्गदर्शक प्रमाणभूत नमुना ठरविणे करण्यात येते. अशा साहित्याचा मुख्य उद्देश म्हणजे अणुशक्तीचा उपयोग करणाऱ्या कोणाही कर्मचाऱ्यास शारीरिक इजा होऊ नये व त्याच्या जीवास कसलाही धोका असून नये हा असतो. संस्थेतर्फे संरक्षणाच्या दृष्टीने संरचित वस्तूंची तपासणी करण्यात येते व तपासणी करण्याच्या साहित्याचे उत्पादनही करण्यात येते.

वैद्यक विभागात चिकित्सेकरिता किरणोत्सर्गी न्यूक्लाइडांचा- अल्पकाल टिकणाऱ्या किरणोत्सर्गी अणूंचा कसा उपयोग करता येईल? यासंबंधी संशोधन करण्यात येते. निरनिराळ्या देशांतील परिस्थितीप्रमाणे पांडुरोग- ॲनिमिया, गलगंड, परजीवीशास्त्र- दुसऱ्यांवर उपजिविका करणाऱ्या सजीवांसंबंधीचे शास्त्र, अपपोषण- पोषणास आवश्यक असणाऱ्या द्रव्यांच्या अभावामुळे निर्माण होणारी स्थिती, अशा विविध विषयांसंबंधी प्रयोग करण्यात येतात. पाणीपुरवठा विभागात किरणोत्सर्गी समस्थानिकांचा उपयोग करून पाणीपुरवठा सुधारण्यासाठी निरनिराळ्या देशांतील परिस्थितीप्रमाणे अनेक प्रयोग करण्यात येतात व समासद राष्ट्रांतील योजनांना मदत करण्यात येते. कृषिविज्ञान शाखेत भात व मका या धान्यांच्या बाबतीत खतांचे शोषण कितपत होते यासंबंधी संशोधन चालते. याशिवाय वनस्पती खाणाऱ्या किडींचा नाश करण्याच्या पद्धतींसंबंधी संशोधन चालते. किरणोत्सर्गी- कण वा किरण बाहेर टाकणाऱ्या समस्थानिकांच्या मदतीने वनस्पतींची वाढ, नव्या जातींचे उत्पादन, रोगनिवारण वगैरे विषयांवरही प्रयोग करण्यात येतात. खाद्यवस्तूंवर किरणोत्सर्गाची प्रक्रिया करून त्या टिकविण्यासंबंधी आणि त्यांतील विषारी द्रव्यांचा नाश करण्यासंबंधी संशोधन करण्यात येते. इतर विभागांत किरणोत्सर्गी द्रव्ये हवेत मिसळल्याने किंवा अन्नात गेल्याने मनुष्याला कसा अपाय होऊ शकतो? यासंबंधी सतत अभ्यास चालू असतो. किरणोत्सर्गी द्रव्ये दुसऱ्या ठिकाणी नेताना त्यांच्यापासून इतर लोकांना उपद्रव झाल्यास कोणते कायदेशीर उपाय योजावेत? यासंबंधी व्हिएन्ना येथे मुद्दाम भरविलेल्या परिषदेने केलेल्या ठरावास संस्थेतर्फे अधिकृत मान्यता देण्यात आली. याठरावात जमिनीवरचे अणुकेंद्रीय विक्रियक व जहाजात बसविलेल्या अणुकेंद्रीय विक्रियकांचाही विचार केलेला आहे. किरणोत्सर्गी द्रव्यांची ने-आण करण्याच्या पद्धती व निरुपयोगी झालेल्या द्रव्यांची विल्हेवाट लावण्याच्या विशेष पद्धती यांसंबंधी संस्थेने बऱ्याच पुस्तिका प्रसिद्ध केल्या आहेत. संस्थेतर्फे किरणोत्सर्गी द्रव्यांचे व मापन पद्धतींचे मानकीकरण, मापक उपकरणांची तपासणी, संशयित द्रव्यांची तपासणी अशी विविध कामे सतत करण्यात येतात.

या संस्थेच्या मुख्य उद्देशाप्रमाणेही संस्था सभासद राष्ट्रांच्या गरजेप्रमाणे त्यांना अणुकेंद्रीय विक्रियकांची सामग्री, तांत्रिक माहिती व योग्य अधिकारी माणसे पुरविण्याचे काम करते. याकरिता शक्य असेल त्या राष्ट्रांनीही संस्थेला उपयोगी पडणारी किरणोत्सर्गी द्रव्ये पुरवावी, अशी अपेक्षा असते. अशा द्रव्यांची किंमत संस्थेने ठरविलेल्या दराप्रमाणे देण्यात येते. संस्थेकडे येणाऱ्या सर्व द्रव्यांची नीट साठवण करून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संस्थेवर असते. या संस्थेकडे येणाऱ्या मालामध्ये युरेनियम, रेडियम अशा अनेक दुर्मिळ व अतिमौल्यवान धातूंचा समावेश होत असल्याने त्या धातू कोठारातून अनधिकृत मार्गाने बाहेर जाण्याची पुष्कळ शक्यता असते. याकरिता संस्थेला विशेष काळजी घ्यावी लागते. अशी मौल्यवान द्रव्ये जगातील निरनिराळ्या भागांत विभागून ठेवतात व कोणत्याही एका ठिकाणी मोठा साठा होणार नाही, अशी खबरदारी घेतात. कोणत्याही सभासद राष्ट्राला अणुकेंद्रीय विक्रियकासारखा नवा प्रकल्प सुरू करावयाचा असला, तर या संस्थेकडे युरेनियम सारख्या दुर्मिळ द्रव्यांची मागणी करता येते. अशी मागणी आली म्हणजे ही संस्था त्या प्रकल्पाची सर्व माहिती मिळविण्याकरिता त्या राष्ट्रात आपले तंत्रज्ञ पाठविते. तंत्रज्ञांना सर्व माहिती मिळाल्यावर तो प्रकल्प समाधानकारक वाटल्यास ही संस्था त्या प्रकल्पाकरिता लागणारे सर्व साहित्य पुरविते. जरूर असल्यास तांत्रिक माहिती व सल्लागार मंडळही पुरविते. अशा वेळी संस्थेला काही विशेष हक्क असतात व काही जबाबदाऱीही असते. अशा नव्या प्रकल्पात उभारावयाचा अणुकेंद्रीय विक्रियकांच्या अभिकल्पाचे परीक्षण करून व त्याबरोबरच्या इतर सरंक्षक योजनांची पाहणी करून त्यांचा उपयोग विनाशक कार्याकडे होऊ शकणार नाही व त्यापासून कर्मचाऱ्यांना कसलीही इजा होणार नाही याबद्दल खात्री करून घ्यावी लागते. याकरिता संस्थेला त्या राष्ट्रात आपले निरीक्षक पाठविण्याचा हक्क असतो. अशा निरीक्षकांना त्या राष्ट्रात कोणाही संबंधित व्यक्तीची मुलाखत घेण्यास त्या राष्ट्राने परवानगी द्यावी लागते. याशिवाय संस्थेला आपले कार्य पूर्ण करण्यासाठी त्या राष्ट्रामध्ये काही विशेष कायदेशीर हक्क मिळतात आणि विशेष सवलतीही मिळतात. या संबंधात काही वाद निर्माण झाला किंवा तो आपणासातील तडजोडीने मिटविता आला नाही, तर तो वाद आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे निर्णयासाठी पाठविता जातो.

सभासदांच्या उपयोगासाठी संस्थेचे एक मोठे ग्रंथालय आहे. त्यात जवळजवळ एकलाख ग्रंथांचा संग्रह उपलब्ध आहे. याशिवाय तेथे निरनिराळ्या विषयांवरील तीनशे चित्रपटांचा संग्रह उपलब्ध आहे. या संस्थेतर्फे सर्व संशोधनासंबंधी अहवाल प्रसिद्ध करण्यात येतात. अ?टॉमिक एनर्जी हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यात येते आणि इतर विविध कार्यासंबंधी अनेक पुस्तके प्रसिद्ध करण्यात येतात, हे उल्लेखनीय! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी स्थापना निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

श्री एन. कृष्णकुमार,
से.नि.अध्यापक.
पोटेगावरोड, गडचिरोली.
भ्रमणध्वनी-
९६९९८३६७१७.

जनप्रभात हे दैनिक जनप्रभात हे दैनिक पत्र मालक,प्रकाशक,मुद्रक :संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर्स, नवीन आष्टा, ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी, जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242

ठाणे सामान्य रुग्णालयाच्या कामांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आढावा

रुग्णालयाच्या वीज जोडणीचे काम 'फास्टट्रॅक' वर करण्याचे निर्देश



मुंबई : ठाणे आणि लगतच्या पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना जागतिक दर्जाच्या आणि अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ठाणे येथील ९०० खाटांचे अत्याधुनिक जिल्हा सामान्य रुग्णालय, महिला व बाल रुग्णालय आणि सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या प्रकल्पाचे काम अत्यंत वेगाने आणि 'फास्टट्रॅक' पद्धतीने पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री यांच्या समिती कक्षात झालेल्या या बैठकीत ठाणे सिव्हिल हॉस्पिटलच्या सद्यस्थितीचा आणि आतापर्यंत झालेल्या कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री सर्वश्री दादाजी भुसे, गुलाबराव पाटील, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, संजय राठोड, प्रताप सरनाईक यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, आरोग्य विभागाचे सचिव ई. रविंद्रन, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार उपस्थित होते.

प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यातील कामांची गती वाढवतानाच प्रशासकीय पातळीवरील दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले.

रुग्णालयाची इमारत पूर्ण झाली असून, वीज जोडणीअभावी रुग्णालयाचे काम सुरू करता येत नसल्याचा मुद्दा बैठकीत चर्चेत आला. यानंतर रुग्णालयासारख्या अत्यावश्यक सेवेसाठी आवश्यक असलेली वीज जोडणीची सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. याशिवाय रुग्णालयाच्या इमारतीची नियमित आणि उच्च दर्जाची स्वच्छता, रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या अद्ययावत वैद्यकीय यंत्रसामग्रीची तातडीने खरेदी तसेच काही दिवसांपूर्वी शासनाकडून मंजूर करण्यात आलेली १०७८ नवीन पदे भरण्याची संपूर्ण प्रक्रिया गतिमान करावी, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले. या महत्त्वाकांक्षी ९०० खाटांच्या विशाल संकुलामध्ये ५०० खाटांचे मुख्य जिल्हा रुग्णालय, २०० खाटांचे स्वतंत्र महिला व बाल रुग्णालय तसेच २०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय एकाच छताखाली कार्यरत राहणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने कार्डिओलॉजी, न्यूरोलॉजी, नेफ्रोलॉजी आणि ऑन्कोलॉजी यांसारख्या गंभीर आजारांच्या उपचारांसाठी सुपरस्पेशालिटी विभाग उपलब्ध असणार आहेत. तसेच आपत्कालीन आणि गंभीर रुग्णांच्या उपचारांसाठी रुग्णालयाच्या इमारतीच्या टेरेसवर विशेष 'हेलीपॅड'ची रचना करण्यात आली असून, तेथे एअर ॲम्ब्युलन्स सहज उतरू शकणार आहे. याशिवाय रुग्णालयात एकूण १६ आधुनिक शल्यचिकित्सागृहे कार्यान्वित केली जाणार आहेत.

हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतर ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील लाखो सर्वसामान्य नागरिकांना उपचारासाठी अन्यत्र जाण्याची गरज भासणार नाही. त्यांना त्यांच्या जिल्ह्यातच अत्याधुनिक आणि सर्वसमावेशक वैद्यकीय उपचार विनामूल्य मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

सोशल मीडियाच्या पोस्टवरून गाव पातळी राजकीय वातावरण तापले, जिल्हा बँक मतदान ठराव चर्चेला उदान



सातारा : सातारा जिल्ह्यामध्ये जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान ठराव गाव पातळीवर लगबग सुरू आहे, सोशल मीडियावर एका पोस्टची चर्चा जिल्हा रंगली आहे ग्रामीण भागाची अर्थवाहिनी म्हणून जिल्हा बँकेला पाहिले जाते एका गावातील एका सोसायटी म्हणून एक मतदान ठराव घेतला जातो त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात पैशाची देवाणघेवाण होऊ शकते सातारा जिल्हा मध्यवर्ती अ्रैंग्रू मर्ह्रैंत म्द-दर्जैंग्र्न्ह्रैंह निवडणूक तोंडावर आहे.. सोसायटी व इतर संस्था मतदार संघातून मतदानासाठी 'ठराव' घेणे सुरु आहे..

एका संचालक मंडळातील एका संचालकांच्या नावे मतदानाचा 'ठराव' घ्यायला इतर संचालक मंडळाला वाटप करण्यासाठी लाखोचा दर निघाल्याची चर्चा आहे.. यामुळे इथं नेतृत्व करण्याची संधी फक्त धनदांडग्यांनाच मिळणार हे नक्की..

अरे संस्था चालते आमच्या शेतकऱ्याच्या घामाच्या पैशावर..

मग हे धनदांडगे कशाला.??

(नोकर भरतीचा मलिदा लाटायला)

निवडणुकीत ज्याच्या नावाचा 'ठराव' आहे तो मतदार असतो..

पुन्हा मतासाठी त्याला द्यायला लाखोचा 'रेट फिक्स' होईल..

या मुळे फक्त आणि फक्त पैशांचा बाजार वाढतोय..

असला लोकशाहीचा 'रंडीबाजार' मांडणारी इलेक्शन आम्हाला नकोत.. त्यापेक्षा ज्या ज्या संस्था सभासद आहेत त्या संस्थेच्या खातेदारांना/ सभासदांना मतदानाचा व उमेदवारीचा खुला अधिकार थेट मिळावा..

किमान सामान्य खातेदाराला/ सभासदाला तेवढा तरी अधिकार राहिल आणि आणि बँकेतील सत्ता विकेंद्रीकरण होईल..

तेव्हाच स्व. यशवंतराव चव्हाण यांची सत्तेचे विकेंद्रीकरण ही संकल्पना खऱ्याअर्थाने सहकारात रुजेल..

सत्य की असत्य यावर चर्चा व विचार होऊन ज्यांच्या व्याजाच्या पैशावर बँक चालते त्या खातेदार / संस्थासभासद मंडळींना न्याय मिळेल..

आणि धनदांडग्यांची 'मिरासदारी' मोडीत निघेल..

आणि जिल्हाबँक नोकर भरती मधले 'रेट फिक्सिंग' थांबेल..

अर्थात त्यासाठी अजून पारदर्शक यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे आणि हे शक्य आहे..

फक्त सामान्य खातेदारांनी यावर न्यायालयात एक याचिका टाकली तरी पुष्कळ..

शामगावमध्ये कृत्रिम दूधनिर्मितीचा मोठा भांडाफोड; इर्ॐच्या धाडीत दाम्पत्य रंगेहात, भेसळीचे मोठे रॅकेट उघड होणार?

शामगावमध्ये कृत्रिम दूधनिर्मितीचा मोठा भांडाफोड; FDA च्या धाडीत दाम्पत्य रंगेहात, भेसळीचे मोठे रॅकेट उघड होणार?



उंब्रज / अमोल पवार

कराड तालुक्यात अन्न व औषध प्रशासनाने सोमवारी केलेल्या धडक कारवाईत कृत्रिम दूधनिर्मितीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. शामगाव ता.कराड येथील एका घरात म्हशीच्या दुधामध्ये पामोलीन तेल व संशयित पांढरी पावडर मिसळून कृत्रिम दूध तयार केले जात असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी महेश यशवंत फाटक (वय ४४) व स्वाती महेश फाटक (वय ३८) या दाम्पत्याला रंगेहात पकडण्यात आले.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर भेसळविरोधी मोहीम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून कराड तालुक्यात ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने शामगाव येथे छापा टाकला असता आरोपी केशरी व गुलाबी रंगाच्या किटल्यांमधील म्हशीच्या दुधात रिफाइंड पामोलीन तेल आणि संशयित पांढरी पावडर मिसळून कृत्रिम दूध तयार करत असल्याचे आढळून आले. याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी वंदना रूपनवर यांनी फिर्याद दाखल केली आहे.

कारवाईदरम्यान सुजाता कंपनीचा मिक्सर, त्याचे भांडे, सुमित कंपनीचा हँड ब्लेंडर तसेच भेसळीसाठी वापरलेले साहित्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या कृत्रिम दुधासह पामोलीन तेल व संशयित पावडरचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, हे पदार्थ मानवी आरोग्यास अपायकारक असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

तपासादरम्यान कृत्रिम दूध विक्री अथवा विल्हेवाटीसाठी खटाव तालुक्यातील राजाचे कुर्ले येथील ओम डेअरीशी संबंधित व्यक्तींशी संपर्क असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच भेसळीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा करणाऱ्यांविषयी आरोपींकडून समाधानकारक माहिती मिळालेली नसल्याने या प्रकरणामागे मोठे भेसळ रॅकेट कार्यरत असल्याचा संशय बळावला आहे. दूध स्वीकारणारे, कच्चा माल पुरवठादार आणि या साखळीतील इतर संबंधितांचा शोध अन्न व औषध प्रशासनाने सुरू केला आहे.

आषाढी एकादशी निमित्त तिरुपती प्रायमरी स्कूल ची भव्य वारकरी दिंडी..



गितांजली लव्हाळे/ बीड वडवणी

दि. २५ जुलै २०२६ : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त तिरुपती प्रायमरी स्कूल, वडवणी येथे विद्यार्थ्यांची भव्य दिंडी उत्साहात आयोजित करण्यात आली. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत मुक्ताबाई, संत एकनाथ महाराज, संत जनाबाई, दिंडीत पाई चालणारे सर्व वारकरी तसेच प्रत्यक्ष भगवान श्री. विठ्ठल व माता रुक्मिणी यांच्या आकर्षक वेशभूषा साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या पाई दिंडीने वडवणी शहरातून पारंपरिक टाळ-मृदंग, हरिनामाचा गजर आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात मार्गक्रमण केले. शहरातील नागरिकांनी दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करत विद्यार्थ्यांच्या भक्तिमय सादरीकरणाचे कौतुक केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना संतपरंपरा, वारकरी संप्रदाय, भक्ती, संस्कार आणि सामाजिक ऐक्य यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून समजले.

शाळेचे मुख्याध्यापक - गणेश सोळंके सर तसेच शिक्षकवृंद - श्रीमती लव्हाळे मॅडम, बागडे मॅडम, साळवे मॅडम, शिरसागर मॅडम, बोंदार्डे मॅडम, औटे सर, परदेशी सर, फपाळ सर, कर्मचारी - पंकज सोळंके, शिवराज शिंदे, अनुसया शिरसागर तसेच पालक आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

रामरहीम नगर कंधार येथे मूलभूत सुविधा साठी नगराध्यक्ष कडे निवेदनाद्वारे मागणी



कंधार/संतोष कांबळे

कंधार शहरातील शासकीय वसाहत असलेल्या रामरहिम नगरमध्ये मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव जाणवत आहे. गेल्या अनेक वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या नाल्या आणि रस्त्यांची कामे पूर्णपणे जीर्ण झाल्याने येथील रहिवाशांना दैनंदिन जीवनात मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे या वसाहतीतील रस्ते, नाल्या व स्ट्रीट लाईटची कामे तात्काळ करावीत. अशी मागणी समस्त रामरहीम नगर वासियांच्या वतीने कंधार नगरपरिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

वसाहतीतील नाल्या ठिकठिकाणी तुटल्याने सांडपाणी रस्त्यावर साचून राहत आहे. त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. परिणामी लहान मुले, वृद्ध आणि नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. याचबरोबर वसाहतीतील सर्वच अंतर्गत रस्ते निकामी झाले आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे रात्रीच्या वेळी जाधव हॉस्पिटल ते शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मुख्य रस्त्यावर स्ट्रीट लाईट नसल्याने अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महिला, प्रौढ नागरिक, विद्यार्थी यांना भीतीच्या सावोटातून जावे लागत आहे. राम रहीम नगर येथील सर्वच जुन्या नाल्या व रस्त्यांचे नव्याने सी.सी. बांधकाम करण्यात यावे. सोबतच जाधव हॉस्पिटल ते शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूने स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी. अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर मकसूद शेख, सुलतान शहा सलीम शहा, गफार शेख, मारुती वाघमारे, सागरबाई एंगडे, तुराब शेख, सुलतान शेख, सुलतान सय्यद, हुसेन शेख, अरुणाबाई गडंबे, पारूबाई कांबळे, चांदू यमुलवाड, मगदूम शेख, पवार नागू, बालाजी रोयलवाड यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनाही देण्यात आल्या आहेत. लवकरात लवकर कामे न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा ही नागरिकांनी दिला आहे.

शिरूर (घोडनदी) आरक्षण क्र. ५७ वरील जागेची मालकी नगरपरिषदेकडेच कायम ठेवण्यास मंजुरी

शिरूर प्रतिनिधी / अविनाश घोगरे

शिरूर, शिरूर नगरपरिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत घोडनदी परिसरातील आरक्षण क्र. ५७ वरील शासकीय जागेची मालकी नगरपरिषदेकडेच कायम ठेवण्यास तसेच मंजूर विकास आराखड्यानुसार त्या जागेवर क्रीडांगण, बगीचा, ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह व व्यापारी संकुल विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. अशी माहिती नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांनी दिली.

रसिकभाऊ धारिवाल सभागृहात नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सर्वे नं. ११३०/१ब, मौजे शिरूर येथील शासकीय जमीन पूर्वी म्युनिसिपल इंडस्ट्रियल इस्टेटसाठी नगरपरिषदेला देण्यात आली होती. सदर जागा सरकारजमा न करता नगरपरिषदेकडेच कायम ठेवून मंजूर विकास आराखड्यानुसार आरक्षणांचा वापर करण्यास सभेने मान्यता दिली.

नगररचना विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सुमारे ६ हेक्टर ९५ आर क्षेत्रावर शासनमान्य विकास आराखड्यानुसार क्रीडांगण, बगीचा, ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह व व्यापारी संकुल उभारण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक वापर बदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात येणार असून जिल्हाधिकारी, पुणे यांनी अंतिम शिफारस केली आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयानेही सकारात्मक अहवाल महसूल व वन विभागाकडे सादर केला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार संबंधित जमीन नगरपरिषदेकडे पुनर्प्रदान करण्याचा प्रस्ताव शासन व मुख्यमंत्री यांच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याची माहिती सभेत देण्यात आली. या निर्णयामुळे शिरूर शहरातील नागरिकांसाठी आधुनिक क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक व व्यापारी सुविधा विकसित करण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी व्यक्त केला. सभेस उपनगराध्यक्ष मितेश गादिया, सभापती सुनील जाधव, एजाज बागवान, स्वाती साठे, डॉ. सुनिता पोटे, आयेशा सय्यद, गटनेते नितीन पाचर्णे, उपसभापती, सर्व नगरसेवक, मुख्याधिकारी प्रीतम पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शामगावला दूध भेसळीवरील अन्न सुरक्षा विभागाची कारवाई

भेसळयुक्त दूध तयार करणारे दाम्पत्य अटकेत



मसूर -: शामगाव ता कराड येथील भेसळयुक्त दूध तयार करणाऱ्या दाम्पत्याला रंगेहात पकडले. या कारवाईत भेसळयुक्त दूध तयार करण्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या अन्न सुरक्षा अधिकारी, श्रीमती वंदना विठ्ठल रुपणवर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कराड तालुक्यातील मसूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दूध भेसळीविरोधात अन्न सुरक्षा व औषध प्रशासन विभागाने पहिल्यांदाच मोठी कारवाई केली आहे.

२७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ८.३० वाजता शामगाव गावच्या हद्दीतील ओंकनाथ मंदिराच्या मागे यशवंत फाटक यांच्या राहत्या घरावर अन्न सुरक्षा विभागाने मसूर पोलिसांच्या मदतीने छापा टाकला. या वेळी महेश यशवंत फाटक (वय ४४) व स्वाती महेश फाटक (वय ३८), रा. शामगाव, ता. कराड हे भेसळयुक्त दूध तयार करताना आढळून आले.

कारवाईदरम्यान केशरी रंगाच्या किटलीतील ३ लिटर व गुलाबी रंगाच्या किटलीतील २ लिटर म्हशीचे दूध, रिफाइंड पामोलीन तेल, पांढऱ्या रंगाची संशयित पावडर, पांढऱ्या रंगाचे द्रव, सुजाता कंपनीचा मिक्सर व त्याचे भांडे, सुमित कंपनीचा हँड ब्लेंडर आदींसह भेसळीसाठी वापरण्यात आलेले सुमारे ?६,९७१ किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले. कृत्रिम म्हशीचे दूध, रिफाइंड पामोलीन तेल, संशयित पावडर व तयार केलेले द्रव हे मानवी आरोग्यास घातक व असुरक्षित असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सर्व नमुने तपासणीसाठी जप्त करण्यात आले.

संशयित पुरवठादार, व भेसळयुक्त दूध कोणतीही चाचणी न करता स्विकारणारे ओम डेअरी, राजाचे कुर्ले (ता. खटाव) येथील संचालक, मालक व भागीदार यांनी जाणीवपूर्वक संगनमत करून सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. भेसळीसाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा पुरवठादार कोण आहे, याची माहितीही आरोपींकडून देण्यात आली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ही कारवाई उंब्रज पोलीस ठाण्याचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे सपोनि पंकज पवार, पोलीस उपनिरीक्षक सुधाकर भोसले, हवालदार महेश लावंड, बाळासो कोळेकर, सुनील पन्हाळे, अशोक पाटील, सुप्रिया इंगवले यांनी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि पंकज पवार करीत आहेत.

या प्रकरणाचा तपास आता भेसळीच्या संपूर्ण साखळीपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने सुरू आहे. पुरवठादार, दूध संकलन व वितरण व्यवस्थेतील संबंधित व्यक्तींचीही चौकशी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या रॅकेटमधील आणखी काही जण तपासाच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि १ व दि. २ रोजी कार्यक्रमांचे आयोजन !



सातारा / अनिल वीर

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव समिती, नगरपालिका व विविध संघटनांच्यावतीने शनिवार दि. १ ऑगष्ट राजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती समितीच्या अध्यक्ष डॉ. पल्लवी अमोल पाटोळे यांनी दिली.

सकाळपासून रात्री उशिरापर्यंत अण्णाभाऊ व डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.

रविवारी दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता पाठक हॉलमध्ये पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते, प्रसिद्ध साहित्यिक, संशोधक, अभ्यासक डॉ. शरद गायकवाड यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. अशी माहिती संबोधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश इंजे व उपाध्यक्ष प्रा. प्रशांत साळवे यांनी दिली.

झुंजार लेखक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे बिनीचे कार्यकर्ते, वंचित शोषित समाजाचे नायक अण्णाभाऊ साठे यांचे पुरोगामी विचार व चळवळीतील दुर्लक्षित मौलिक योगदान आजच्या परिस्थितीत लोकांसमोर आणणे गरजेचे आहे. या हेतूने संबोधी प्रतिष्ठानच्यावतीने विशेष कार्यक्रम येथील छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगरवाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. संघटक दिनकर झिंब्रे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभात, 'लोकशाहीर, कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांचे अलौकिक क्रांतिकार्य व विचाराची प्रस्तुतता ' या विषयावर डॉ. शरद गायकवाड बोलणार आहेत. सदरच्या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संबोधी प्रतिष्ठानचे कार्यवाह ?ड. हौसेराव धुमाळ, सहकार्यवाह डॉ. सुवर्णा यादव, कोषाध्यक्ष यशपाल बनसोडे, विश्वस्त अनिल बनसोडे, केशवराव कदम, अशोक कांबळे, प्रकाश गायकवाड, अशोक भोसले व डॉ. जयपाल सावंत यांनी केले आहे.

संबोधी प्रतिष्ठानच्या वतीने दहावी, बारावी मध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या सातारा शहरातील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गेले सतरा वर्षापासून गौरव करण्यात येत आहे. या वर्षीच्या दि. १२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या गौरव समारंभासाठी ९० टक्केच्या वर गुण प्राप्त केलेल्या अनुसूचित जाती जमाती, भटके विमुक्त, व्हीजेएनटी व ओबीसी अध्ययनार्थींनी समारंभावेळी नावे नोंदवावीत. असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, येथील लोकशाहीर, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे कृती समितीतर्फे लोकशाहीर, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समितीचे संस्थापक उमेश चव्हाण यांनी दिली.

मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळे वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. जयंतीच्या अनुषंगाने परिवर्तनवादी विचारांचा जागर करण्यासाठी पोवईनाका येथील हॉटेल हेम एक्झिक्युटिव्ह येथे रविवारी दुपारी १ वा. डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिध्द इतिहास संशोधक, लेखक व विचारवंत डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे जाहीर व्याख्यान होणार आहे. यावेळी विविध मान्यवरांचा सन्मान सोहळा तसेच क्रांतीदिन व आदिवासी दिन साजरा करण्यात येणार आहे. उद्घाटक म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप तुपे उपस्थितीत राहणार असून यावेळी शिक्षक संघटनेचे महेंद्र अवघडे, ?ड. राजेंद्र गलांडे, प्रा. धनराज आवळे, चंद्रकांत देवरुखकर, सुरेश बोतालजी, रासपचे जिल्हाध्यक्ष रमाकांत साठे, ज्येष्ठ कार्यकर्ते अमर गायकवाड, अण्णा वायदंडे, रघुनाथ बाबर, किशोर गाल्फाडे, सत्यवान कमाने, ?ड. संतोष कमाने, मुंबई उच्च न्यायालयातील ?ड. आशिष राठोड, ?ड. नारायण निकम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सदरच्या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे. असे आवाहन समितीचे पदाधिकारी किशोर कांबळे, महेश वायदंडे, संदीप माने, आशिष जाधव, सचिन मोरे, सौ. मनिषा चव्हाण, रीना भोसले, रुपिता पवार, अक्षदा काळे, वैभव गवळी, सुभाष गुंजाळ, धनाजी भोसले, माधुरी भोसले, चमेली पवार, आशिकी गुंजाळ, सविता कणसे, विमल शिंदे व भोसले यांनी केले आहे.

मुंबई विद्यापीठ पेपरफुटी प्रकरणाची सीआयडी चौकशी स्वागतार्ह;

मात्र चौकशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार निष्पक्ष व पारदर्शकपणेच व्हावी – अभाविप

मुंबई : विद्यापीठातील टी.वाय.बी.कॉम. पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, मुंबई महानगर यांच्या वतीने २० एप्रिलपासून सातत्याने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनातील प्रमुख मागण्यांपैकी एक असलेली सीआयडीमार्फत चौकशी करण्याची मागणी अखेर मान्य झाली असून, दिनांक २७ जुलै रोजी झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत या संदर्भातील ठराव संमत करण्यात आला. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी अभाविपने उभारलेल्या सातत्यपूर्ण आणि संघर्षशील लढ्याचा महत्त्वपूर्ण विजय आहे.



तथापि, या ठरावासोबत चौकशीच्या अटी व कार्यकक्षा (ऊर्ल्ह्ह् णदहग्गदहे) निश्चित करण्याचे अधिकार कुलगुरूंना देण्यात आले आहेत. त्यामुळे चौकशी प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवण्यासाठी ती कोणत्याही प्रकारच्या हस्तक्षेप, पक्षपात किंवा दबावापासून मुक्त राहणे अत्यंत आवश्यक आहे.

अभाविपची स्पष्ट आणि ठाम मागणी आहे की, या प्रकरणाची चौकशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ तसेच मुंबई विद्यापीठाच्या लागू नियमावलीनुसारच करण्यात यावी. चौकशीदरम्यान कोणत्याही दोषी व्यक्तीस संरक्षण मिळू नये, कोणतीही माहिती दडपली जाऊ नये आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या प्रत्येक दोषीवर कठोर व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

तसेच या चौकशी पूर्ण होई पर्यंत संबंधीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात यावे, अशी अभाविप मागणी करते.

पेपरफुटी हे केवळ प्रशासकीय अपयश नसून, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि विद्यापीठाच्या विश्वासार्हतेशी संबंधित अत्यंत गंभीर प्रकरण आहे. त्यामुळे या चौकशीत पूर्ण पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व राखणे ही काळाची गरज आहे.

मुंबई विद्यापीठाची परीक्षा व्यवस्था आणि संस्थेची विश्वासार्हता अबाधित ठेवण्यासाठी ही चौकशी वेळेत, निष्पक्ष आणि कायद्याच्या चौकटीत पूर्ण व्हावी, अशी अभाविपची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी अभाविप पुढील काळातही या संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे अभाविप तर्फे स्पष्ट करण्यात आले.

ह्या पत्रकार परिषदेत मुंबई महानगर मंत्री अभिषेक पवार, महानगर सह मंत्री समीर हरजाणी, शशिकांत चौहान, अलका यादव व कोकण प्रांत मीडिया संयोजक पियुष हिंगमिर उपस्थित होते.

मुंबई उपनगर जिल्ह्यात वांद्रे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान

लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण

मुंबई: मुंबई उपनगर जिल्ह्यातील वांद्रे येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे उद्घाटन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार वरुण सरदेसाई, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यातील नगरसेवक उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रकारचे दाखले प्रातिनिधिक स्वरूपात वितरित करण्यात आले. नागरिकांची विधानसभा मतदारसंघनिहाय आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये अधिकाधिक सहभाग नोंदवून शासकीय सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी प्रास्ताविकात या अभियानाचा मुख्य उद्देश नागरिकांना महसूल विषयक सेवा जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देणे हा असल्याचे सांगितले.

शिबिराच्या ठिकाणी लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत विविध दाखले, ७/१२ उतारे, आधार नोंदणी, रेशनिंगसंबंधित प्रलंबित कामे तसेच विविध योजनांचे अर्ज स्वीकारून अनेक प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात आली. तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजना आणि आधुनिमान भारत कार्डचे वितरण करण्यात आले. महसूल विभाग, नगर भूमापन कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग, शिधावाटप कार्यालय, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महिला बचत गट, समाज कल्याण विभाग आदी कार्यालयांचे स्वतंत्र स्टॉल शिबिरामध्ये लावण्यात आले होते.

या अभियानानंतर मुंबई उपनगर जिल्ह्यातील प्रलंबित विधानसभा मतदारसंघात शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, प्रलंबित महसूल प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यात येत आहे. तसेच नागरिकांच्या महसूल विषयक अडचणींचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी गावपातळीवर तसेच कार्यालयीन स्तरावर विशेष प्रयत्न करत आहेत.

गुणवंतांचा सन्मान म्हणजे शिक्षण क्षेत्रासाठी नवी ऊर्जा - डॉ.अलका पोतदार



पिंची विघडलीअसा दोष सर्वांनाच देता येणार नाही.अनेक युवकांनी माऊलीच्या पालखीत जाऊन सेवा केली.शिवाय, संस्कृती जपली आहे.'

सातारा /अनिल वीर

शिक्षकांचा सन्मान म्हणजे केवळ त्यांच्या कार्याचा गौरव नसून चांगली पिढी घडविणाऱ्या मूल्यांचा सन्मान असतो.गुणवंत विद्यार्थी, शिक्षक यांचा गौरव शिक्षणक्षेत्रासाठी नवी ऊर्जा असते.शिक्षकांनी नवीन अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे बारकाईने वाचन करुन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करत अध्यापन करावे,असेप्रतिपादन बालभारती,पुणेच्या हिंदी भाषा विशेषाधिकारी डॉ.अलका पोतदार यांनी केले.

जिल्हा हिंदी अध्यापक मंडळ व राष्ट्रभाषानुरागी शिक्षक-शिक्षकेतर पतसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने येथील राष्ट्रभाषाभवन येथे आयोजित ४३ व्या संयुक्त वार्षिक पुरस्कार वितरण व सत्कार समारंभात अध्यक्षस्थानावरुन पोतदार बोलत होत्या. माध्यमिक शिक्षणाधिकारी धनंजय चोपडे म्हणाले, 'व्यावसायिक विकास व व्यक्तिगत विकास साधण्याचे कार्य दोन्ही संस्था करत असून येथे स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणारा विद्यार्थी घडतो.'

विद्या परिषद (एस.इ.आर.टी.) पुणे येथील अभ्यासक्रम समन्वयक व आय टी विभाग प्रमुख डॉ.संदीप मुळे म्हणाले, 'शिक्षकांनी आधुनिक टेक्नॉलॉजीचा वापर करून विद्यार्थ्यांमध्ये भाषेची गोडी निर्माण करावी. त्यासाठी ए आय साथी, दीक्षा २.० चा वापर करावा.'

प्रमुख वक्ते प्रा.श्रीधर साळुंखे म्हणाले,'ग्रामीण राहून सेवा करणे ही तपश्चर्या आहे.देशाचे भविष्य युवकांच्या मार्फत घडविणे ही आपली जबाबदारी असून आपण मार्गदर्शक म्हणून केलेल्या कामासाठी पाठीवर टाकलेली थाप म्हणजे हे पुरस्कार असतात.युवा प्रास्ताविकपर भाषणात जिल्हा हिंदी अध्यापक मंडळाचे अध्यक्ष ता. क्र. सूर्यवंशी यांनी हिंदी अध्यापक मंडळ व राष्ट्रभाषानुरागी पतसंस्थेच्या वाटचा आलेखाची माहिती दिली.

कोल्हापूर विभागीय शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष रघुनाथ जाधव यांनी मंडळाचे आदर्श कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

यावेळी मंडळाच्या कार्यात विशेष योगदान देणारे शिक्षक, पदाधिकारी प्राप्त शिक्षक,विशेष ग्राकिय मिळविलेल्या सदस्यांचा गौरव करण्यात आला. तसेच राष्ट्रभाषा परीक्षा शिरुवृत्ती परीक्षा,महामंडळ परीक्षा व विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक यांना एकूण १५४ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

प्रारंभी मानवंदनेच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन संपन्न झाले. ईशस्तवन व स्वागत गीत मंडळाच्या गीतमंचाचे प्रमुख अनिल बदम व सहकाऱ्यांनी सादर केले.मंडळ व पतसंस्थेच्या पदाधिकारी यांचे हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.सूत्रसंचालन सी.डब्ला मोरे व गुलाब पठाण यांनी केले.तर अण्णासाहेब पाटील यांनी आभार मानले.सदरच्या कार्यक्रमास शालाप्रमुख,हिंदी शिक्षक,विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष शाहनवाज मुजावर, इकबाल मुल्ला,परीक्षा मंत्री शि.रा.खामकर, श्रीकांत लावंड,विजयकुमार पिसाळ, सुधाकर माने,हणमंत सूर्यवंशी,सौ. सुनंदा शिवदास सौ.दिपाली पवार, सागर पाटील,सर्व तालुकाध्यक्ष, व्यवस्थापक नवनाथ शिंदे व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

राज्यात २९ ते ३१ जुलैदरम्यान विविध भागांत मध्यम ते मुसळधार पावसाचा अंदाज



मुंबई : बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांत २९ ते ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. या कालावधीत विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश, कोकण तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच विदर्भ, उत्तर मराठवाडा आणि खानदेशमध्ये वाऱ्याचा वेग वाढण्याचाही अंदाज आहे. तुलनेने मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या दक्षिण भागात कमी पावसाची शक्यता आहे.

या काळात अतिवृष्टीसदृश पावसाच्या घटना घडू शकतात. त्यामुळे सखल भागांत पाणी साचणे, नदी-नाल्यांना पूर येणे, काही प्रमाणात संरचनात्मक नुकसान होणे, वाहतुकीवर परिणाम होणे तसेच काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी दरड कोसळण्याचाही धोका आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार, २९ जुलैरोजीकमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव प्रामुख्याने विदर्भात, विशेषतः पूर्व विदर्भात जाणवण्याची शक्यता आहे. ३० जुलै रोजी त्याचा प्रभाव पश्चिम विदर्भ, खानदेश, उत्तर मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील घाट परिसर आणि कोकणात अधिक जाणू शकतो. ३१ जुलै रोजी खानदेशातील काही भाग तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात पावसाचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे.

मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशात ३० आणि ३१ जुलैदरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांत ३० जुलैरोजी पावसाची तीव्रता अधिक राहण्याचा अंदाज आहे.

विदर्भ, उत्तर मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहावे. विशेषतः सखल भाग, नदी-नाल्यांच्या परिसरात तसेच घाट रस्त्यांवरून प्रवास करताना अधिक काळजी घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पोलिस मित्र गुन्हे नियंत्रण आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्थेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी वजीर शेख यांची निवड

महाराष्ट्र राज्याध्यक्ष राजहंस वाडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान; सामाजिक जनजागृती व मानवाधिकार क्षेत्रातील कार्याची दखल

पुणे/ प्रतिनिधी:

समाजसेवा, जनजागृती आणि मानवाधिकार संरक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या पोलिस मित्र, क्राईम कंट्रोल अँड इंटरनॅशनल ह्युमन राईट्स ऑर्गनायझेशन (रण्ण्ळ्ळ्) या संस्थेच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी वजीर शेख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष श्री. राजहंस वाडे यांच्या हस्ते त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करून ही निवड जाहीर करण्यात आली.



वजीर शेख यांच्या सामाजिक, पत्रकारिता आणि जनहिताच्या कार्याची दखल घेत संस्थेने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. नियुक्तीनंतर त्यांनी राज्यभरात मानवाधिकार संरक्षण, महिला सुरक्षा, बालमजुरी प्रतिबंध, भ्रष्टाचारविरोधी जनजागृती, वाहतूक नियमांचे पालन, पर्यावरण संवर्धन, सामाजिक न्याय आणि गरजू नागरिकांना कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्यासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

संस्थेच्या माहितीनुसार, समाजातील गरीब व असहाय नागरिकांना मदत करणे, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी जनजागृती करणे, कन्या भ्रूणहत्या प्रतिबंध, अंधश्रद्धाविरोधी अभियान, व्यसनमुक्ती, शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे तसेच पोलिस प्रशासनाला आवश्यक सहकार्य करणे, आशा विविध सामाजिक उपक्रमांवर संस्थेचा भर आहे.

वजीर शेख यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, पत्रकार, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नवतरुण मित्र मंडळ पाणजेच्या वतीने वृक्षारोपण व स्वच्छता अभियान उत्साहात संपन्न



तालुका प्रतिनिधी /विठ्ठल ममतावादे

उरण : नवतरुण मित्र मंडळ, पाणजे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्षा सहलीचे औचित्य साधून वृक्षारोपण तसेच शिवमंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाच्या सदस्यांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच शिवमंदिर परिसराची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा आदर्श निर्माण केला आहे.यावेळी अक्कादेवी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात आर. झुंजारावला ट्रस्टचे ड्रॉक्टर व सहकारी, ग्रामपंचायतीचे सरपंच लकपती पाटील, माजी उपसरपंच अविनाश पाटील, मंडळाचे अध्यक्ष दर्शन पाटील, कार्याध्यक्ष हेमंत पाटील, चंद्रकांत पाटील, विश्वनाथ पाटील, सदस्य अरुण पाटील, जितेंद्र पाटील, ?ड. विक्रम पाटील, मिलिंद पाटील, मंजीत पाटील, दीपेश पाटील, नंदलाल पाटील, सुशांत पाटील, सुनील पाटील, सचिन भोईर, महेंद्र पाटील, प्रकाश पाटील, लहुराज भोईर मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते.या सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षारोपण आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या उपक्रमाचे कौतुक होत असून, झुंजारावला ट्रस्टचे ड्रॉक्टर व सहकारी यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

४२ वर्षे परंपरा जोपसणारे मित्र मंडळ

पाणजे, सातत्याने ४२ वर्षे परंपरा जोपसणारे नवतरुण मित्र मंडळाच्या या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, युवकांनी केवळ मनोरंजनाकडे न पाहता सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

पागोटे येथे विद्यार्थी गुणगौरव व सामाजिक उपक्रमांचा प्रेरणादायी सोहळा उत्साहात संपन्न

तालुका प्रतिनिधी / विठ्ठल ममतावादे

उरण : कुणाल पाटील युवा सामाजिक संस्था व शिवसेना शाखा पागोटे यांच्या संयुक्त विद्यमाने पागोटे येथे विद्यार्थी गुणगौरव व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . सोमवार, दि. २७ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता श्री गणेश हनुमान मंदिर, पागोटे येथे हा कार्यक्रम मोठया उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमांतर्गत नवघर जिल्हा परिषद शाळांमधील आदर्श व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, तसेच उरण तालुक्यातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला आहे. यासोबतच पागोटे गावातील निराधार व गरजू महिलांना वस्तू वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रमही यावेळी राबविण्यात आला. शिक्षण आणि सामाजिक सेवा यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमातून समाजातील गरजू घटकांना आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



कार्यक्रमाला विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.विशेषतः मनोहरशेठ भोईर माजी आमदार, गणेश शिंदे उरण माजी नगराध्यक्ष, अतुल ठाकूर नगरसेवक गटनेता, अमित ठाकूर नगरसेवक, प्रेरणाताई पाटील जिल्हा परिषद सदस्य, परेश ठाकूर उपसभापती, दीपक भोईर पंचायत समिती सदस्य, संतोष पवार उरण सामाजिक संस्था सेक्रेटरी, महादेव बंडा माजी उपसभापती, सुनील तांडेल राष्ट्रवादी काँग्रेस नवघर पंचायत समिती, सुजित काशिनाथ पाटील काँग्रेस अध्यक्ष पागोटे, महेंद्र पाटील शिवसेना शाखा प्रमुख पागोटे आदी मान्यवर उपस्थित होते तसेच कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार, वस्तूवाटप आणि अन्य सामाजिक उपक्रम पार पडला.या उपक्रमासाठी रायगड जिल्हा परिषद सदस्या प्रेरणा कुणाल पाटील तसेच पागोटे ग्रामपंचायतीचे सरपंच कुणाल अरुण पाटील यांच्यासह शिवसेना शाखा पागोटे व ग्रामस्थ मंडळ पागोटे यांचे सहकार्य लाभले आहे.विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांच्या उज्ज्वल भवितव्याला प्रोत्साहन देणे आणि गरजू महिलांना मदतीचा हात देणे, या दुहेरी उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा सामाजिक उपक्रम पागोटे परिसरातील सामाजिक बांधिलकीचे एक प्रेरणादायी उदाहरण ठरला आहे. कार्यक्रमाचे उत्तम आयोजन व नियोजन असल्यामुळे उपस्थित मान्यवर, नागरिकांनी व ग्रामस्थांनी कार्यक्रमाचे व आयोजकांचे कौतुक केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारकाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला वाढता पाठिंबा...



शिरूर प्रतिनिधी / अविनाश घोगरे

शिरूर, शिरूर शहरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे भव्य स्मारक तसेच स्वागत कमान उभारण्यात यावी, या मागणीसाठी लहुजी शक्ती सेनेचे दादाभाऊ लोखंडे (सहसचिव, लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य) आणि विनोद उर्फ पप्पू साठे (उपाध्यक्ष, लहुजी शक्ती सेना, शिरूर शहर) यांनी दि. २७ जुलै २०२६ पासून सुरू केलेले आमरण उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरू असून, या आंदोलनाला विविध स्तरांतून वाढता पाठिंबा मिळत आहे. या आंदोलनाला भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक निलेश पवार, सागर नरवडे आणि अमेश शेळके यांनी जाहीर पाठिंबा देत उपोषणकर्त्यांची भेट घेतली. उपोषणकर्त्यांच्या मागण्या न्याय्य असून, प्रशासनाने त्याची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

उपोषणकर्त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा. उपोषणकर्त्यांच्या न्याय्य आंदोलनाला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या आमरण उपोषणामुळे शिरूर शहरात या प्रश्नाकडे नागरिकांचे लक्ष वेधले गेले आहे. विविध सामाजिक व राजकीय संस्थांनुसह तसेच सामाजिक व राजकीय संस्थांनुसह पूर्ण बातमी आणि नांव पण तीच चुकीची शब्द रचना नको जे दिले तीच बातमी घ्यावी आणि फोटो पण हाच घेऊन बातमी बनवून द्यावे पेपर साख्रे आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला जात असून, प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक भूमिका घेत या मागणीची दखल घ्यावी, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

भाजप नगरसेवक निलेश पवार, सागर नरवडे व उमेश शेळके यांचा जाहीर पाठिंबा; दादाभाऊ लोखंडे व विनोद उर्फ पप्पू साठे यांच्या आंदोलनाला बळ..

महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी ट्री आय फाऊंडेशनचा 'न्युट्रिशन फॉर ऑल' उपक्रम

कडेठाण, बेटवाडी व वरवंड येथे ट्री आय फाऊंडेशन द्वाराआयोजित आरोग्य तपासणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे प्रतिनिधी/ शकील मनियार

पोषक मोहाच्या लाडू द्वारे महिलांमधील रक्ताल्पता कमी करण्यास सहाय्य, तसेच महिला आरोग्य विषयी जनजागृती करणे या उद्देशाने ट्री आय फाऊंडेशन व कोर्नरस्टोन आणि इमरिस इंडिया यांच्या सीएसआर सहाय्याने ,राबविण्यात येणाऱ्या 'न्युट्रिशन फॉर ऑल (न्ट्रिग्दह इर्ँ ॅल – र्ँ)' या प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यातील कडेठाण, बेटवाडी आणि वरवंड येथे आरोग्य तपासणी शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला ग्रामस्थ महिला, शाळेतल्या किशोरवयीन मुली यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कडेठाण येथील त्र्यंबक दिवेकर विद्यालयात आयोजित शिबिरामध्ये गावातील महिला व शालेय विद्यार्थिनींची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक मा. संतोष दिवेकर, कडेठाणच्या सरपंच मा. सोनाली नराळे, ट्री आय फाऊंडेशनच्या संचालिका मा. तमन्ना इनामदार, न्यूट्रिशन फॉर ऑल प्रकल्पाच्या समन्वयक सौ. विद्या लगड , सौ. दिपाली खेसे तसेच ट्री आय फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.

बेटवाडी येथे आयोजित शिबिरात श्री योग माध्यमिक विद्यालयातील इयत्ता नववी व दहावीच्या किशोरवयीन विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ महिलांनी तपासणीसाठी उपस्थिती लावली. या कार्यक्रमास फाऊंडेशन च्या संचालिका मा. तमन्ना इनामदार, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. प्रसाद गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्या सौ. सुशीला कडू, प्रभाग संघाच्या अध्यक्षा सौ. सुमित्रा कडू, सचिव सौ. उज्ज्वला भुजबळ तसेच सीआरपी ईंदुताई होले आणि प्रकल्प समन्वयक आसमा सय्यद उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी प्रकल्पाचे कौतुक करून टीमचे अभिनंदन केले व शेवटी सागर दांडगे यांनी आभार प्रदर्शन केले .

वरवंड येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरासाठी महिलांनी हजेरी लावली. या कार्यक्रमास संचालिका सौ. तमन्ना इनामदार, वरवंडच्या सरपंच सौ. योगिनी दिवेकर, माजी सरपंच सौ. मीनाताई दिवेकर तसेच पंचायत समिती सदस्य श्री. प्रदीप दिवेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयक नसरिन पटेल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या प्रकल्पांतर्गत आरोग्य तपासणीचे अहवाल संबंधित लाभार्थींना त्यांच्या मोबाईलवर पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर पुढील तीन महिन्यांपर्यंत महिलांना पोषणमूल्यांनी समृद्ध मोहाचे लाडू वितरित करण्यात येणार असून, त्यानंतर पुन्हा आरोग्य तपासणी करून महिलांच्या आरोग्यात झालेल्या सुधारणांचा आढावा घेतला जाणार आहे.ट्रीआय फाऊंडेशनच्या 'न्युट्रिशन फॉर ऑल' हा प्रकल्प मागच्या वर्षी पुण्याच्या ग्रामीण आणि शहरी अश्या पाच हजार लाभार्थी महिलांपर्यंत पोहचला आहे. या प्रकल्पाचे मुख्य उद्देश पारंपारिक अन्नपदार्थांचे प्रचार आणि प्रसाराद्वारे महिला आरोग्य संवर्धन आणि बळकटीकरण करणे हे आहे.

गावात न येताच बसेसचा 'बायपास', दोनशेवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात

केळझर येथे बस नेण्यास चालक, वाहकांची चालढकल प्रतिक्षेनंतर गावात बस न आल्याने विद्यार्थ्यांना जावे लागते घरी . शाळा - कॉलेज सुरु होताच चालक - वाहकाची अरेरावी सुरु





सेलू. प्रशांत झाडे

वर्धा ते नागपूर मार्गावरील केळझर येथे बसगाड्यांचा थांबा देण्यात आला आहे. येथून शेकडो विद्यार्थी दररोज शाळा, महाविद्यालयात सेलू, वर्धेला आवागमन करतात. पण, बहुतांशबसगाड्या नागपूर-वर्धा राष्ट्रीय महामार्गानेच बायपासने भरधाव पळतात. गावात बसेसचा येत नसल्याने विद्यार्थ्यांना तासनतास ताटकळावे लागते. दररोज गावात दोन - दोन तास बस येत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालय ,ट्यूशन क्लासेसला न जाता घरी परत जावे लागते.. त्यामुळे केळझरसह परिसरातील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

तालुक्यातील केळझर गाव वर्धा ते नागपूर मार्गावरील महत्त्वाचे गाव आहे. परिसरातील अनेक गावे केळझराला जोडली आहेत. महत्त्वाचा थांबा असलेल्या केळझर येथे जलद बसफेऱ्यांना थांबा देण्यात आला आहे. नागपूर - तुळजापूर हा राष्ट्रीय महामार्ग झाल्यानंतर गावापासून काही अंतरावर बायपास गेला आहे. बसफेऱ्यांना थांबा असल्याने बसफेऱ्या गावात येणे आवश्यक आहे. पण, बहुतांश बसफेऱ्या बायपासनेच जातात. अनेक वाहक तर चक्क केळझरचा थांबा नसल्याचेही सांगत प्रवाशांना घेण्यास नकार देत असल्याचे अनेकांनी अनुभवले आहे. गावात न येता सरळ बायपासमार्गेच बसगाड्या जात असल्याने विद्यार्थी, व्यापारी, नोकरदार सर्वसामान्य प्रवाशी असे सर्वांनाच त्रास सहन करावा लागत आहे. बसगाड्या गावात आणण्यास टाळाटाळ केली जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देत बसेस गावात न नेणाऱ्या चालक, वाहकांवर कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.

बॉक्स प्रतिक्षेनंतरही बस न आल्याने विद्यार्थ्यांना जावे लागते घरीङ

केळझर येथून वडगाव- (जंगली) , आमगाव - (खडकि), जुनगड, गायमुख, देहेगाव गोसावी , खडकी, नवरगाव (पु.) सेलडोह आदी ठिकाणचे दोनशे ते अडीचशे विद्यार्थी शिक्षणाकरिता आवागमन करतात. त्यामुळे प्रतिक्षा करूनही बस न आल्याने विद्यार्थ्यांना घरी परत जावे लागते.

अधिकारी कारवाई कधी करणार?

चालक, वाहकांच्या या प्रकाराबाबत वेळोवेळी निवेदने देण्यात आलीत. अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. पण, कारवाई मात्र होत नसून केळझर येथे बस थांबविण्यास टाळाटाळ कायम असल्याचे दिसते..

ऑटोचालकांना द्यावे लागते जास्तीचे रुपये

दोन तास प्रतिक्षा करूनही बस न आल्याने विद्यार्थ्यांना घरी परत जायची वेळ येते तेव्हा जास्तीचे रुपये देवून गरजू विद्यार्थ्रांना आटोने जावे लागते..परत येते वेळि रात्री बायपास वरच उतरुन देतात.रात्री बायपास वर कुणी राहत नसुन सुमसाम जागेवरुन गावात एककिलोमीटर जागा पायदळ यावे लागते.

सेलू बसस्थानकावरील खड्डे बुजवणार तरी कधी?



प्रवेशद्वारावरच खड्ड्यांचा धक्का; प्रवासी, विद्यार्थी आणि नागरिक त्रस्त

सेलू/ प्रशांत झाडे

सेलू शहरातील बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. बसस्थानकात प्रवेश करताच वाहनांना आणि प्रवाशांना खड्ड्यांचा जोरदार धक्का बसत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.सेलू बसस्थानक हे तालुक्यातील प्रमुख वाहतूक केंद्र असून दररोज शेकडो प्रवासी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणासाठी ये-जा करतात. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकीस्वार घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली असून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

बसस्थानकात येणाऱ्या एसटी बसनाही खड्ड्यांमुळे संथगतीने प्रवेश करावा लागत असल्याने वाहतुकीवर परिणाम होत आहे. अनेक दिवसांपासून ही समस्या कायम असतानाही संबंधित प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रवासी आणि स्थानिक नागरिकांनी बसस्थानक परिसरातील खड्डे तातडीने बुजवून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंतापदी श्री. सुदीप राणे यांची पदोन्नतीवर नियुक्ती.



कोराडी /दिलीप वेवले

महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात पदोन्नतीवर मुख्य अभियंता म्हणून श्री. सुदीप राणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ते कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात उपमुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. दि. ३० मार्च २०२६ पासून त्यांच्याकडे मुख्य अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर त्यांनी मुख्य अभियंता पदाची जबाबदारी सांभाळली असून, पदोन्नतीनंतर त्यांची कोराडी औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री. राणे यांनी सन १९९८ मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून तत्कालीन एमएसईबीच्या सेवेत प्रवेश केला. विशेष म्हणजे, त्यांच्या सेवाकालातील पहिले नियुक्तीस्थळही कोराडी औष्णिक विद्युत केंद्र हेच होते. सुमारे २८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्यांची पुन्हा त्याच वीज केंद्रावर मुख्य अभियंता म्हणून नियुक्ती झाल्याने हा त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीतील अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी क्षण ठरला आहे.

त्यांनी यांत्रिकी अभियांत्रिकी (B.E. Mechanical) पदवी संपादन केल्यानंतर विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (VNIT), नागपूर येथून एम.टेक. पदवी प्राप्त केली आहे.

श्री. राणे यांना कोराडी, भुसावळ, खापरखेडा तसेच महानिर्मितीच्या विविध औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये वीज निर्मिती संचालन (Operation), देखभाल-दुरुस्ती (Maintenance), प्रकल्प व्यवस्थापन, कार्यक्षमता वृद्धी आणि तांत्रिक प्रशासन या क्षेत्रातील प्रदीर्घ व समृद्ध अनुभव आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक तांत्रिक सुधारणा, कार्यक्षमता वाढ आणि उत्कृष्ट वीज निर्मितीची उद्दिष्टे यशस्वीरीत्या साध्य करण्यात आली आहेत.

त्यांच्या तांत्रिक ज्ञान, दूरदृष्टी, प्रभावी नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्याच्या बळावर कोराडी औष्णिक विद्युत केंद्र भविष्यात वीज निर्मिती, सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शनाच्या क्षेत्रात नवे मानदंड प्रस्थापित करेल, असा विश्वास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रातील एकमेव बृहस्पती महाराज मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव

२९ जुलैला भाविकांची मांदियाळी, बंद पथदिवे सुरू करण्याची मागणी



सेलू/ प्रशांत झाडे

सेलू तालुक्याच्या सीमेवर आणि नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यात येणाऱ्या वनग्राम चौकी येथील महाराष्ट्रातील एकमेव तसेच भारतातील दुसऱ्या गुरू बृहस्पती महाराज मंदिरात बुधवार, २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा होणार आहे. यानिमित्त मंदिर परिसरात यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात कीर्तन, भजन, पूजन यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. वर्षभर या मंदिरात दूरवरून भाविक दर्शनासाठी येत असतात. परिसरात नव्याने रानी शक्तिपीठाची निर्मिती झाल्याने भाविकांच्या संख्येत आणखी वाढ झाली आहे.

निसर्गरम्य वनराईने नटलेल्या उंच टेकड्यांच्या कुशीत वसलेले हे पुरातन बृहस्पती महाराज मंदिर हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवांचे गुरु म्हणून मानले जाणारे बृहस्पती महाराज यांचे मंदिर अत्यंत दुर्मीळ असून, भारतातील दुसरे आणि महाराष्ट्रातील एकमेव मंदिर

म्हणून त्याचे विशेष महत्त्व आहे. श्रद्धेपोटी येथे येणारे भाविक नियमितपणे प्रसाद पंगतीचे आयोजन करतात. पथदिवे बंद; अंधारामुळे अपघाताची भीती

मंदिर परिसरातून हिंगणा-नागपूर-कान्होलीबारा हा प्रमुख मार्ग जातो. मंदिरालगतच्या रस्त्यावर तीन तीव्र वळणे असून, या भागात अपघाताचा धोका कायम असतो. वाहनचालकांना रात्रीच्या वेळी रस्ता स्पष्टपणे दिसावा, यासाठी रस्त्याच्या दुतर्फा पथदिवे बसविण्यात आले आहेत. मात्र, हे पथदिवे गेल्या अनेक महिन्यांपासून बंद आहेत.

गुरुपौर्णिमा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्याच्या दुतर्फा बंद असलेले पथदिवे सुरू करावेत, तसेच परिसरातील रस्ते व इतर मूलभूत सुविधांची पाहणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाविकांनी केली आहे.

विद्यार्थीनींनी स्वतः ची सुरक्षेची काळजी घेत सोबतच मोबाईल ऑनलाईन फसवणूकी पासून सावध राहणे काळाची गरज



तालुका प्रतिनिधी /अमोल झाडे

समुद्रपूर :

विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर येथे विद्यार्थीनींची सुरक्षितता, महिला अत्याचार प्रतिबंध, पॉक्सो कायदा तसेच सायबर क्राईम या विषयांवर विद्यार्थ्यां सोबत चर्चा करण्यात आली . या वावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मेघश्याम ढाकरे, समुद्रपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा. दीपक वानखेडे व पोलीस उपनिरीक्षक चेतन टेभुरणेस यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

ठाणेदार वानखेडे विद्या विकास महाविद्यालयात महिला अत्याचार, व सायबर क्राईम यावर चर्चा

यावेळी विद्यार्थिनींनी कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराला बळी पडू नये, तसेच अन्याय किंवा छळ झाल्यास घाबरून न जाता तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. पॉक्सो कायद्यांतर्गत बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध तरतुदींची माहिती देण्यात आली. तसेच मोबाईल, सोशल मीडिया व इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची काळजी, ऑनलाइन फसवणूक, सायबर छळ आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारून पोलिस अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. विद्यार्थिनींमध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण करून त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे चर्चासत्र उपयुक्त ठरले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हे कनस्टेबल जोती राऊत,संदीप उईके, रोशन उईके, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा महेश चिखाणे, सतिश बेले,रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा मनोज बावणे, प्रा सीमा तडस, फरीश अली, राजू बाभूळकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

सेलू शहरात दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध



सेलू/ प्रशांत झाडे

दिल्ली येथील जंतर-मंतर येथे शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित बळाचा वापर करण्याच्या घटनेचा साहसिक जनशक्ती संघटना, पत्रकार संघटना, सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना व सेलू तालुक्यातील नागरिकांमार्फत तीव्र निषेध करण्यात आला आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना न्याय मिळावा व त्यांच्या न्याय मागण्यांबाबत तात्काळ निर्णय घेण्यात यावा, यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांच्या नावाने मा. तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू मार्फत निवेदन सादर करण्यात आले.

देशातील विद्यार्थी आपल्या न्याय मागण्यांसाठी शांततामय मार्गाने आंदोलन करत असताना त्यांच्यावर झालेला कथित बळाचा वापर अत्यंत गंभीर असून, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे व लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याच्या अधिकारावरही परिणाम होत आहे.

या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषीवर योग्य ती कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्यात यावेत आणि विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांवर शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

आंदोलनात मृत्यू झालेल्या २२ विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी. विद्यार्थ्यांवर अश्रू गोळीबार अथवा अन्य प्रकारचा बळाचा वापर करण्यास जबाबदार असलेल्या संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून दोषीवर कायदेशीर कारवाई व गुन्हे दाखल करण्यात यावेत. आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत.

यापुढील सर्व भरती प्रक्रिया व स्पर्धा परीक्षा पूर्णपणे पारदर्शक, निष्पक्ष, भ्रष्टाचारमुक्त व गुणवत्तेच्या आधारे राबविण्यात याव्यात. रोठा येथे अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणातील दोषींना कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेची हमी देऊन त्यांच्या न्याय मागण्यांवर शासनाने तात्काळ या निवेदनाची गंभीर दखल घेऊन तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी, अशी नम्र व ठाम विनंती यावेळी करण्यात आली आहे.यावेळी साहसिक जनशक्ती संघटनचे अध्यक्ष रवींद्र कोटंबकर , शिवसेना (उबाठा) चे तालुका प्रमुख अमर गुंडी, योगेश इखार,माजी उप नगराध्यक्ष चुडामन हांडे, कमलेश लटारे, सागर राऊत,पत्रकार संघटना, सामाजिक संघटना, विद्यार्थी व सेलू तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

नागपूर-विदर्भात पुढचे तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

नागपूर/ दिलीप वेवले

विदर्भात पुढील तीन दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता असून अनेक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. उद्या दि. २९ जुलै रोजी भारतीय हवामान विभागाने दिलेला इशारा लक्षात घेऊन जिल्हा दंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नागपूर शहर, ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सुटीचे आदेश निर्गमित केले आहेत. नागरिकांनीही आवश्यकता ती खबरदारी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

विदर्भासाठी इशारा

दिनांक ३० जुलै रोजी नागपूरला हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला असून प्रशासनाने गावपातळीवर खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. गेल्या २४ तासांत विदर्भात सर्वाधिक १३९ मिमी पावसाची नोंद भंडारा जिल्ह्यातील साकोली येथे झाली. गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी येथे १०३.४ मिमी पाऊस झाला. या दोन्ही ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली.

हवामान विभागानुसार २९ जुलै रोजी नागपूर, भंडारा, वर्धा, या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट

२९ जुलै रोजी नागपूर शहर, ग्रामीण, हिंगणा व कामठी तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना सुटी जाहीर आवश्यक ती खबरदारी घेण्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे सर्व तालुका दंडाधिकाऱ्यांना आदेश

तर चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट तर यवतमाळसह अकोला, अमरावती, बुलडाणा व वाशिम जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांत काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. ३० जुलै रोजी चंद्रपूर जिल्ह्यास रेड अलर्ट असून भंडारा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि अमरावती जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट आहे. अकोला, बुलडाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट आहे. ३१ जुलै रोजी अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

नागरिकांसाठी सूचना

मेघगर्जना सुरू असताना उघड्यावर न थांबणे, झाडाखाली आश्रय न घेणे, नदी-नाले व पूरग्रस्त भागांपासून दूर राहणे तसेच वीज पडण्याच्या शक्यतेमुळे आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

'वाचनातून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना भावपूर्ण आदरांजली; विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी उपक्रम'



सेलू/ प्रशांत झाडे

ऐंजल्स पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूल, केळझर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन उपक्रम राबवून त्यांना भावपूर्ण अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व पुष्पांजली वाहून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शांत व शिस्तबद्ध वातावरणात पुस्तके वाचून ज्ञान, वाचन संस्कृती आणि आत्मविकासाचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांचे प्रेरणादायी जीवन, त्यांचे विज्ञान क्षेत्रातील योगदान आणि 'मोठी स्वप्ने पाहा व ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करा' हा संदेश सांगण्यात आला.

याप्रसंगी संस्था प्रमुख मा. श्री. नरेंद्र सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. वाचन हीच ज्ञानाची खरी गुरुकिल्ली असून प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज नियमित वाचनाची सवय लावली पाहिजे. मोठी स्वप्ने पाहा, त्यासाठी कठोर परिश्रम करा आणि आपल्या ज्ञानाच्या बळावर देशाच्या प्रगतीत योगदान द्या. डॉ. कलाम यांचे विचार आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.'

विद्यालयाचे प्राचार्य यांनीही विद्यार्थ्यांना नियमित वाचन, शिस्त, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या विचारांचे अनुकरण करून आदर्श नागरिक बनण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, ज्ञानाची जिज्ञासा आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणारा ठरला.

पोदार वर्ल्ड स्कूलमध्ये विद्यार्थी नेतृत्व शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

नागपूर/दिलीप वेवले

पोदार वर्ल्ड स्कूल, कोराडी रोड, नागपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा विद्यार्थी नेतृत्व शपथविधी सोहळा (व्हनेरेली णीसदहब) अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. अशोक बागुल, सहाय्यक पोलीस आयुक्त (नि.), नागपूर यांचे शाळेच्या संचालिका श्रीमती उमल लॉईड्स, मुख्याध्यापिका श्रीमती अर्पणा पेंटा तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागतगीताने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती अर्पणा पेंटा यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना नेतृत्व, शिस्त, सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि जबाबदारी या मूल्यांचे महत्त्व सांगितले. नेतृत्व म्हणजे केवळ पद नसून समाजाप्रती असलेली बांधिलकी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

यानंतर विद्यार्थी मंत्रिमंडळाचा पदग्रहण सोहळा पार पडला. मुख्य विद्यार्थी (हेड बॉय) परिमल शेंबेकर, मुख्य विद्यार्थिनी (हेड गर्ल) आरवी मौना, उपमुख्य विद्यार्थी (व्हाइस हेड बॉय) ओम निशाद, उपमुख्य विद्यार्थिनी (व्हाइस हेड गर्ल) मनस्वी पडोळे, सांस्कृतिक मंत्री अर्णव गजभिये, शिस्तप्रमुख प्रियांशू दुधभारवे तसेच क्रीडाप्रमुख पार्थ मवाळे यांना मान्यवरांच्या हस्ते बॅज व सॅश प्रदान करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापिका श्रीमती अर्पणा पेंटा यांनी सर्व विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

त्यानंतर चारही हाऊसच्या कॅप्टन्सना बॅज, सॅश आणि हाऊस ध्वज प्रदान करण्यात आले. यामध्ये सत्य हाऊस कॅप्टन प्रथम आंबाडे, सेवा हाऊस कॅप्टन तुषार राऊत, अहिंसा हाऊस कॅप्टन चिरायू चट्टाणी तसेच आदर्श हाऊस कॅप्टन अलायशा यांनी आपल्या-आपल्या हाऊसचे नेतृत्व स्वीकारत शाळेच्या मूल्यांचे जतन करण्याची शपथ घेतली.



प्रमुख पाहुणे डॉ. अशोक बागुल यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात नेतृत्वगुण, चारित्र्य, शिस्त, सायबर सुरक्षितता, सामाजिक जबाबदारी आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक दृष्टिकोन, कठोर परिश्रम आणि प्रामाणिकपणाच्या बळावर आदर्श नागरिक बनण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपमुख्याध्यापिका श्रीमती रितू भाटिया यांनी आभारप्रदर्शन केले. त्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

मुख्याध्यापिका श्रीमती अर्पणा पेंटा यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली संपूर्ण विद्यार्थी नेतृत्व शपथविधी सोहळा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख श्वेता आणि शुभांगी यांनी विशेष सहकार्य व मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, शिक्षकांचे उत्कृष्ट नियोजन, शाळा व्यवस्थापनाचे सहकार्य आणि सर्व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा सोहळा प्रेरणादायी, संस्मरणीय आणि यशस्वी ठरला.

पालघरच्या महापूर बाधितांसाठी एकात्मिक मदत आराखडा तयार करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वसई-विरार परिसरात अतिवृष्टीत पाणी साठवणारे 'होल्डिंग स्पॉट', आपत्तीच्या काळातही अखंडित वीज पुरवठ्यासाठी 'इन्फ्रास्ट्रक्चरल अपग्रेडेशन'

मुंबई, दि. २८ : पालघर हा मुबलक पाऊस पडणारा आणि वेगाने नागरीकरण होत असलेला जिल्हा आहे. या पार्श्वभूमीवर भविष्यातील विविध प्रकारच्या आपत्ती टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. अतिवृष्टी आणि महापुरामुळे बाधित कुटुंबांना नियमातील तरतूदीपेक्षा अधिक मदत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष पॅकेज मंजूर करण्यात येईल. त्यासाठी पालघर आणि नाशिक जिल्ह्यांसाठी एकात्मिक मदत आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पालघर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. बैठकीस वनमंत्री गणेश नाईक, आपत्ती व्यवस्थापन व उलसंपदा (कोकण व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल, आमदार हरिश्चंद्र भोये, आमदार विनोद निकोले, आमदार राजेंद्र गावित, आमदार विकास तोरे, आमदार राजन नाईक, आमदार देवयानी फरांदे,



मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मदत व पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित नागरिकांना तातडीची मदत उपलब्ध करून देतानाच भविष्यात अशा आपत्तीचा परिणाम कमी करण्यासाठी कायमस्वरूपी पायाभूत सुविधा उभारण्यावर भर द्यावा. जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी दळणवळण आणि रस्ते सुविधा प्राधान्याने पूर्ववत करण्यात. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग आणि संबंधित यंत्रणांनी आवश्यक रस्ते निश्चित करून युद्धपातळीवर काम करावे.

ऊर्जा विभागांतर्गत महावितरण आणि संबंधित कंपन्यांनी वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पायाभूत संरचनेची पुनर्रचना करावी. आपत्तीच्या काळातही अखंडित वीजपुरवठा राखता यावा, यासाठी तिन्ही वीज कंपन्यांनी आवश्यक उपाययोजना करत इन्फ्रास्ट्रक्चरल अपग्रेडेशन करावे.

तसेच जलसाठे आणि पाण्याच्या प्रवाहांचा सखोल अभ्यास करून त्यांचे नकाशे तयार करावेत आणि त्यांचा विकास आराखड्यांमध्ये समावेश करावा. भविष्यात विकास परवानग्या देताना या अभ्यासाचा आधार घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

वसई-विरार परिसरात अतिवृष्टीच्या काळात पाणी साठविण्यासाठी 'होल्डिंग स्पॉट'

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वसई-विरार परिसरात अतिवृष्टीच्या काळात भौगोलिक परिस्थितीमुळे पाण्याचा निचरा होण्यास विलंब होतो. त्यामुळे पाणी साठविण्यासाठी 'होल्डिंग स्पॉट' विकसित करण्यात यावेत. यासाठी मुदत संपलेल्या लीजवरील जागांचा वापर करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

कोकण विभागातील रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी ज्या पद्धतीने नियोजन करण्यात आले आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा)च्या माध्यमातून महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) अंतर्गत पालघर जिल्ह्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा. त्यामुळे पायाभूत विकास अधिक सक्षम होईल आणि जागतिक बँकेचा निधी उपलब्ध करून घेण्यासही मदत होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पालघर जिल्ह्यातील भूगावाचे मॅपिंग करून बेस मॅप तयार करावा. या नकाशांचा उपयोग विकासप्रक्रल्पांचे नियोजन, पाणी निचरा व्यवस्था आणि भविष्यातील विकास आराखडे तयार करण्यासाठी करण्यात यावा. समृद्धी महामार्गाच्या कामात अशा प्रकारच्या नियोजनाचे सकारात्मक परिणाम दिसून आले असून, पालघरमध्येही त्याच धर्तीवर नियोजन करावे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अधिक मदतीसाठी विशेष पॅकेज

एकात्मिक मदत आराखड्यास तातडीने मंजुरी देण्यात येईल. यापूर्वी कोल्हापूर येथील महापुराच्या वेळी अशा प्रकारची मदत देण्यात आली होती. नुकसानग्रस्त घरे आणि दुकाने यांचे पंचनामे जलदगतीने पूर्ण करावेत. रस्ते व इतर पायाभूत सुविधांचे सर्वेक्षण करून जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

तात्काळ आणि दीर्घकालीन मदतीसाठी आवश्यक प्रस्ताव त्वरित सादर करावेत. या कामांसाठी आवश्यक निधी शासन उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

पालघरमधील मदत व पुनर्वसन कार्यात केंद्र शासन आणि राज्य शासनाचे विविध विभाग सहभागी असून, या सर्व विभागांची संयुक्त आढावा बैठक लवकरच घेण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी अतिवृष्टी व महापुराच्या काळातील पालघरमधील मदत कार्याचा आढावा घेतला. मंत्री गणेश नाईक यांनी वसई-विरार परिसरात पाण्याचे होल्डिंग स्पॉट विकसित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रस्ते आणि दळणवळण व्यवस्था तातडीने पूर्ववत करण्याबाबत सूचना केल्या.

आमदार हरिश्चंद्र भोये, राजेंद्र गावित, विकास तोरे, राजन नाईक आणि विनोद निकोले यांनी अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या स्थानिक समस्या आणि सुरू असलेल्या मदत कार्याची माहिती बैठकीत दिली.

बैठकीस अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, मिलिंद म्हैसकर, ओ. पी. गुप्ता, विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, प्रधान सचिव एकनाथ डवले, पालघरच्या जिल्हाधिकारी ईंदुराणी जाखर, राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक भालचंद्र चव्हाण तसेच शासनाच्या विविध विभागांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

चुकीच्या दिशादर्शक फलकाने घेतला जीवघेणा वळण

येणाडा फाट्यावर अपघातांची मालिका, वरुडच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कारचा चेंदा-मेंदा

सीटबेल्टमुळे थोडक्यात बचाव, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हलगर्जीपणावर नागरिकांचा संतप्त सवाल

आष्टी (शहीद) :- आष्टी तालुक्यातील घनदाट जंगल परिसरातून जाणाऱ्या आष्टी–मोर्शी मार्गावरील येणाडा फाटा हा आता अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट' ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने येथे लावलेल्या कथित चुकीच्या दिशादर्शक फलकामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या वाहनचालकांची दिशाभूल होत असून, त्यातून वारंवार अपघात घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. नुकत्याच झालेल्या भीषण अपघातात वरुड ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पंकज केचे यांच्या बॅलेनो कारचा अक्षरशः चेंदा-मेंदा झाला. मात्र, त्यांनी सीटबेल्ट लावलेला असल्याने सुदैवाने त्यांचा जीव वाचला.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबिकापूर येथील रहिवासी डॉ. पंकज केचे हे काही कामानिमित्त घरी आले होते. त्यानंतर ते बॅलेनो कारने आष्टीमार्गे वरुडकडे जात असताना येणाडा फाट्यावर पोहोचले. त्याचवेळी नागपूरहून आलेली स्विफ्ट डिझायर कार मोर्शीकडे जाण्यासाठी या मार्गावर आली होती. चालक प्रथमच या मार्गावर आल्याने फाट्यावर लावलेल्या दिशादर्शक फलकामुळे त्याची दिशाभूल झाल्याचे सांगितले जात आहे. मोर्शीकडे जाण्याऐवजी वाहन येणाडा गावाच्या दिशेने वळल्याने समोरून येणाऱ्या डॉ. केचे





यांच्या कारला जोरदार धडक बसली. या भीषण धडकेत दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. विशेषतः डॉ. केचे यांच्या कारची अवस्था पाहता अपघाताची तीव्रता स्पष्ट होत होती. मात्र, सीटबेल्टमुळे त्यांचा जीव थोडक्यात बचावला. अपघातानंतर दोन्ही वाहनचालकांमध्ये वाद निर्माण झाला. त्यावेळी डॉ. केचे यांनी आपले मित्र सोनू भार्गव आणि डॉ. जयप्रकाश बाळस्कर यांना घटनास्थळी बोलावले. त्यांनी परिस्थिती शांत करत आष्टी पोलिसांना माहिती दिली.

आष्टी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अपघाताची नोंद घेत तपास सुरू केला आहे. मात्र, या अपघाता मागे केवळ वाहनचालकांची चूक होती की चुकीच्या दिशादर्शक फलकामुळे वाहनचालकाची दिशाभूल झाली, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

स्थळाची पाहणी न करताच फलक लावला का?

येणाडा फाटा हा आष्टी आणि मोर्शी तालुक्यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गावरील संवेदनशील ठिकाण आहे. त्यामुळे येथे दिशादर्शक फलक बसविताना प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करून वाहनचालकांना स्पष्ट दिशा मिळेल, याची खात्री करणे आवश्यक होते. मात्र, नागरिकांच्या म्हणण्यानुसार योग्य नियोजन आणि पाहणी न करता फलक उभारण्यात आल्याने बाहेरगावाहून

चुकीचा दिशादर्शक फलक लावण्याचे ठिकाण मला माहित नाही व मला कोणी तक्रार सुद्धा केली नाही मी त्वरित चौकशी करून जर चुकीचे फलक असेल तर त्याला योग्य ठिकाणी लावण्याचे काम करतो भुषण नासरे

शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, आष्टी

चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी

एका चुकीच्या दिशादर्शक फलकामुळे एखाद्याचा जीव धोक्यात येऊ शकतो, याची जाणीव सार्वजनिक बांधकाम विभागाला आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून येणाडा फाट्यावरील सर्व दिशादर्शक फलकांची पाहणी करावी, चुकीचे किंवा दिशाभूल करणारे फलक त्वरित दुरुस्त अथवा हटवावेत आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य दिशादर्शक व्यवस्था उभारावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

येणाऱ्या वाहनचालकांची दिशाभूल होत आहे. 'उपविभागीय अधिकारी पठाण यांना येणाडा फाटा आणि मोर्शी मार्गाची प्रत्यक्ष भौगोलिक माहिती आहे का? फलक बसविण्यापूर्वी त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली होती का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वर्धा शहरामध्ये व प्रत्येक प्रभागा मध्ये फवारणी व धुरळीकरण करण्यात यावे



वर्धा : शहरांमध्ये पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे डेंग्यू आणि मलेरियाच्या (हिवताप) रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे डेंग्यू आणि मलेरियाची शहरांमधील पावसाळ्यानंतर डासांची उत्पत्ती वाढल्याने तापाच्या रुग्णांत झपाट्याने वाढ होत आहे नगरपालिकेने घरोघरी जाऊन ताप सर्वेक्षण, औषध फवारणी आणि डासांच्या अळ्या नष्ट करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करायला पाहिजे.

प्रभाग क्रमांक १ मधील झाडाच्या फांद्या वाढल्यामुळे येथील नागरिकांना फिरायला त्रास होत आहे तसेच नाली रोड सफाई ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साठत असतो त्या ठिकाणी ब्लिचिंग पावडर मारण्यात यावे या सर्व विषयावर चर्चा करून वर्धा शहराचे माजी शहर उपाध्यक्ष विशाल हजारे यांनी वर्धा शहराचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांना निवेदन देवून नागरिकांच्या व्यथा मांडल्या

घरामागे किंवा परिसरात पाणी साचू देऊ नका, भांडी नियमित स्वच्छ ठेवा तीव्र ताप थंडी वाजणे, डोकेदुखी अंगदुखी आणि तीव्र थकवा आल्यास तातडीने डॉक्टरचा सल्ला घ्यावा असे आवाहन विशाल हजारे यांनी नागरिकांना केले निवेदन देताना विशाल हजारे महेश जगदने रंजीत रेवतकर उदय बनकर सुरेंद्र राजधानी गौतम देशभर तर धीरज वाघ उपस्थित होते

तीन वेगवेगळ्या कारवाईमध्ये दोन लाख ८८ हजार रुपयाचा अवैध दारू साठा जप्त

हिंगणघाट : येथील गुन्हे प्रकटीकरण पथक अंमलदार पेट्रोलिंग करीत असतांना तालुक्यातील मौजा लाडकी ते वुरकोणी रोडने दोन मोटार सायकलवर वेगवेगळे दोन इसम नामे आरोपी बबन थुल व भगवान काळे हे देशी दारूचा माल वाहतूक करतांना मिळून आल्याने बबन थुल याचे ताब्यातून १२,००० रू. देशी दारूचा साठा, एक दुचाकी प्रो प्लस क्र एमएच ३४ एएल ९७४२ मोटर सायकल कि. ९०,००० रू असा जु.कि. १,०२,००० रू चा माल जप्त केला. दुसऱ्या कारवाई मध्ये भगवान काळे याचे ताब्यातून देशी दारूचा साठा १२,००० रू, स्प्लेंडर क्र एमएच ३४एजे ७५०९ मोटर सायकल कि. ७०,००० रू असा जु.कि. ८२,००० रू चा माल मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिसरी कारवाई येथील संत तुकडोजी वार्ड येथे राहनारा संदीप चापले हा मोपेड वाहनाचे डिक्कीमध्ये विदेशी दारू बाळगून विक्री करतांना मिळून आल्याने त्याचे ताब्यातुन मोपेड गाडी क्रमांक एम ३२ एवाय ३३२६ व सदर मोपेड वाहनाचे डिक्कीमध्ये एका टिफीन देशी दारूचा विदेशी दारूचा साठा जु.किं. १,०४,००० रू चा माल जप्त करण्यात आला. अशा एकूण तीन वेगवेगळ्या कारवाईमध्ये एकूण जु.किं. २,८८,००० रू चा माल जप्त करून सदर आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमरे , उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक पोलीस निरीक्षक अनिल राउत यांचे आदेशाने पो.उपनि महेश इटकल, पोलीस स्टेशन येथील डि.बी. पथकाचे पोलीस हवालदार प्रशांत ठोंबरे, प्रवीण बोधाणे ,पो.ना राजेश शेंडे, पोशी



मंगेश वाघमारे, पोशी आशिष नेवारे, पो.शि. रोहीत साठे, यांनी केली. सदर गुन्ह्यांचा पुढील तपास पोलीस करत आहे.

विदर्भाच्या विकासासाठी सीएसआर निधीचा अधिक वाटा आवश्यक : पंडित शंकरप्रसादजी अग्निहोत्री



वर्धा : विदर्भासारख्या मागास आणि कृषीप्रधान भागाच्या सर्वांगीण विकासासाठी कंपन्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीचा अधिक वापर होणे गरजेचे असल्याचे मत ज्येष्ठ समाजसेवक पंडित शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांनी व्यक्त केले. सध्या सीएसआर निधीपैकी ६० ते ७० टक्के निधी मुंबई, पुण्यासारख्या विकसित शहरांमध्ये खर्च होत असून विदर्भाला अत्यल्प निधी मिळत असल्याने ग्रामीण विकास, शेती, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राचा अपेक्षित विकास होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

विदर्भात पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि शैक्षणिक साधनसुविधांची कमतरता आहे. अशा परिस्थितीत सीएसआर निधीतून गावांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, डिजिटल सुविधा, कौशल्य विकास केंद्रे आणि महिलांच्या स्वयंसहायता गटांना प्रोत्साहन देणारे प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञान, ड्रिप सिंचन, सेंद्रिय शेती, मृदा परीक्षण, शेतमाल प्रक्रिया केंद्रे आणि बाजारपेठ उपलब्ध करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविता येईल.

आरोग्य क्षेत्रात ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, मोबाईल क्लिनिक, मोफत आरोग्य शिबिरे आणि मातृ-बाल आरोग्य योजनांना सीएसआर निधीचा आधार मिळावा. शिक्षण क्षेत्रात शाळांची अधोसंरचना, डिजिटल वर्गखोल्या, संगणक प्रयोगशाळा, वाचनालये, शिष्यवृत्ती आणि शिक्षक प्रशिक्षणासाठीही हा निधी वापरण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

शासनाने विदर्भासाठी स्वतंत्र सीएसआर धोरण तयार करून कंपन्यांना या भागात अधिक निधी खर्च करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. तसेच जिल्हास्तरावर समन्वय समित्या स्थापन करून निधीच्या वापरात पारदर्शकता आणि परिणामकारकता सुनिश्चित करावी, अशी मागणीही पंडित शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांनी केली.

आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातर्फे करण्यात आले भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन

वर्धा: ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि परवडणाऱ्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, दता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), वर्धा अंतर्गत कार्यरत आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या वतीने आमदार श्री. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या सहकार्याने कोहळी, हादगाव आणि आमदार श्री देवराव भोंगळे यांच्या सहकार्याने जिवती येथे महाआरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या आरोग्य उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोहळी, हादगाव येथील शिबिरामध्ये ७०० हून अधिक तर जिवती येथील शिबिरामध्ये ९०० हून अधिक रुग्णांनी विविध आजारांवरील तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, तपासणी, उपचार, आरोग्य समुपदेशन तसेच मोफत औषधांचा लाभ घेतला. या शिबिरासाठी २० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टर, तसेच २० आरोग्य कर्मचारी व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या समर्पित पथकाने सेवा बजावली. रुग्णांना सर्वसाधारण आरोग्य



तपासणीबरोबरच उच्च रक्तदाब, मधुमेह, ?निमिया यांसारख्या असंसर्गजन्य व जीवनशैलीशी संबंधित आजारांची तपासणी, प्राथमिक निदान, आरोग्यविषयक मार्गदर्शन आणि जनजागृती करण्यात आली. शिबिरादरम्यान अधिक तपासणी व प्रगत उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, वर्धा येथे संदर्भित करण्यात आले. या सर्व रुग्णांवर पीएमजेएवाय आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पूर्णतः मोफत उपचार करण्यात येणार आहेत. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे उपसंचालक डॉ. अभिषेक जोशी यांनी सांगितले की, या शिबिरामध्ये असंसर्गजन्य आजारांचे लवकर निदान, ग्रामीण महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वंचित घटकांमध्ये आरोग्य जनजागृती वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला. दता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश अग्रवाल यांनी सांगितले की, अशा आरोग्य उपक्रमांमुळे ग्रामीण व वंचित समाजापर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पोहोचण्यास मोठी मदत होते. विशेषतः आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या महिलांना आणि गरजू नागरिकांना अशा शिबिरांचा मोठा आधार मिळतो.